


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २१० * नांदेड * शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# ही तर लोकशाहीसाठी धोक्याची घंटा

लोकशाहीची खरी ताकद मतदारांच्या हातात असते. मतदानाचा हक्क हा केवळ घटनात्मक अधिकार नसून लोकशाही व्यवस्थेचा प्राण आहे. मात्र हा अधिकार टिकवून ठेवण्यासाठी मतदारांनी स्वतःही जागरूक राहणे आवश्यक असते. सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरनिरीक्षण मोहिमेत अनेक नागरिकांकडून दिसून आलेली उदासीनता ही चिंताजनक आहे. निवडणूक आयोगाने वारंवार आवाहन करूनही लाखो मतदारांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडे (बीएलओ) आवश्यक अर्ज भरून दिलेले नाहीत. या निष्काळजीपणाचा परिणाम म्हणून हजारो नव्हे, तर लाखो मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीतून वगळली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुणे जिल्ह्याचे उदाहरण याबाबत डोळे उघडणारे आहे. सुमारे ९० लाखांहून अधिक मतदारांपैकी जवळपास १५ लाख मतदारांनी अद्याप गणना अर्ज पूर्ण केलेले नाहीत. त्यातील सुमारे ११ लाख मतदार दिलेल्या पत्त्यावर तीन वेळा भेट देऊनही आढळले नसल्याने त्यांचे अनुपस्थितीत पंचनामे तयार करून निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले आहेत. परिणामी, २४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीतून ही नावे वगळली जाण्याची शक्यता आहे. असाच प्रकार इतर जिल्ह्यांमध्ये देखील कमी अधिक प्रमाणामध्ये आढळून येतो. मृत, स्थलांतरित किंवा दुबार नोंद असलेल्या मतदारांची नावे वगळणे आवश्यक असले, तरी प्रत्यक्षात जिवंत आणि पात्र मतदार केवळ उदासीनतेमुळे यादीबाहेर जाण्याचा धोका अधिक गंभीर आहे. असे आढळून आले आहे की, काही मतदारांची नावे आठ ते दहा ठिकाणी वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये आहेत आणि अशा प्रकारचे ते मतदान देखील करीत आहेत. हे टाळणे लोकशाहीच्या आरक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहे. निवडणूक आयोगाने ही मोहीम कोणालाही त्रास देण्यासाठी नव्हे, तर मतदार यादी अधिक अचूक आणि पारदर्शक करण्यासाठी सुरू केली आहे. याद्वारा आपल्या देशात घुसखोरी करून राहिलेल्या लोकांना देखील शोधणे सोपे जाणार आहे. यासाठी प्रत्येक बीएलओ घराघरांत जाऊन माहिती पडताळत आहेत. तरीही अनेक नागरिक घरात उपलब्ध राहत नाहीत, अर्ज स्वीकारत नाहीत किंवा अर्ज भरून परत देण्याची तसदी घेत नाहीत. काहीजण नंतर करू, वेळ नाही किंवा आमचे नाव आधीपासूनच आहे या समजुतीत राहतात. हीच निष्काळजी वृत्ती पुढे मोठे नुकसान करणारी ठरते. मतदार यादीत नाव नसल्यास निवडणुकीच्या दिवशी मतदान करता येत नाही. मतदान केंद्रावर ओळखपत्र, आधार कार्ड किंवा इतर कोणतेही कागदपत्र असले तरी मतदार यादीत नाव नसेल तर मतदानाचा अधिकार वापरता येत नाही. म्हणजेच काही मिनिटांचा वेळ वाचवण्यासाठी अर्ज न भरल्याची किंमत पुढील पाच वर्षे लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार गमावून मोजावी लागू शकते. आजच्या डिजिटल युगात माहितीची कमतरता हा मुद्दा राहिलेला नाही. निवडणूक आयोगाने संकेतस्थळ, मोबाईल ॲप, हेल्पलाईन आणि बीएलओ यांच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतरही नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध असते. मात्र त्यासाठीही नागरिकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. प्रशासनाने दरवाजापर्यंत येऊन केलेल्या प्रयत्नांना नागरिकांचा प्रतिसाद मिळाला नाही, तर दोष केवळ यंत्रणेला देता येणार नाही. याचबरोबर प्रशासनानेही जनजागृती अधिक प्रभावी करण्याची गरज आहे. ग्रामीण भागात, शहरी वस्त्यांमध्ये, महाविद्यालये, गृहनिर्माण संस्था आणि उद्योगांमध्ये विशेष मोहीम राबविणे आवश्यक आहे. स्थलांतरित कामगार, विद्यार्थी आणि नोकरीसाठी बाहेर राहणाऱ्या नागरिकांपर्यंतही माहिती पोहोचविण्याचे नियोजन झाले पाहिजे. कारण मतदार यादीतील प्रत्येक नाव म्हणजे लोकशाहीचा एक महत्त्वाचा आवाज आहे. मतदानाचा अधिकार हा सहज मिळालेला नाही. स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीने प्रत्येक प्रौढ नागरिकाला समान मतदानाचा अधिकार दिला. या अधिकाराचे जतन करण्याची जबाबदारी केवळ निवडणूक आयोगाची नसून प्रत्येक मतदाराची आहे. बीएलओने दिलेला अर्ज वेळेत भरून देणे, स्वतःचे नाव यादीत असल्याची खात्री करणे आणि आवश्यक असल्यास दुरुस्ती करून घेणे ही प्रत्येक नागरिकाची नागरी जबाबदारी आहे. लोकशाही मजबूत ठेवायची असेल, तर मतदार यादी पुनरनिरीक्षणाबाबत होणारी ही उदासीनता तातडीने संपवावी लागेल. अन्यथा लाखो नावे यादीतून कमी होतील, मतदारसंख्या घटेल आणि अनेक पात्र नागरिकांचा मतदानाचा मूलभूत अधिकार त्यांच्या स्वतःच्या निष्काळजीपणामुळे हिरावला जाईल. त्यासोबतच अनेक अपात्र आणि देशद्रोही लोक निवडून येण्याचा धोकाही फार मोठा आहे. मतदानाचा दिवस येण्यापूर्वीच लोकशाहीतून स्वतःचे नाव वजा होऊ नये, याची खबरदारी प्रत्येक मतदाराने आजच घेणे हीच काळाची गरज आहे.

# धर्मस्वातंत्र्य कायदा : एक चिकित्सक आढावा

धर्म स्वातंत्र्याचा कायदा राष्ट्रपतीच्या मंजुरीने महाराष्ट्रात नुकताच लागू झाला आहे. स्वातंत्र्याची पंच्याहत्तरावी ओलांडल्यानंतर नव्याने लागू करण्यात आलेल्या कायद्याची उपयुक्तता व वास्तविकता जाणून घेऊ.



नव्याने लागू झालेल्या 'धर्मस्वातंत्र्य कायदा-२०२६' नुसार बळजबरीने, फसवणूक करुन किंवा आमिष दाखवून धर्मांतर करण्यास प्रवृत्त करणाऱ्या प्रवृत्तीला आळा घालण्याच्या उद्देशाने हा कायदा महाराष्ट्रात लागू करण्यात आला आहे. यापूर्वी मध्यप्रदेश, कर्नाटक, राजस्थान, झारखंड, हिमाचल प्रदेश, हरियाणा, ओडीसा, छत्तीसगड यासह एकूण बारा राज्यांनी त्यांच्या राज्यात धर्मस्वातंत्र्याचा कायदा लागू केला असून, महाराष्ट्र हे 'धर्मस्वातंत्र्य कायदा' लागू करणारे देशातील तेरावे राज्य ठरले आहे.

या कायद्यानुसार स्वेच्छेने धर्मांतर करू इच्छिणाऱ्या व्यक्तीस धर्मांतर करण्यापूर्वी किमान साठ दिवस म्हणजे दोन महिने अगोदर जिल्हा दंडाधिकाऱ्यास लेखी पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे. तसेच या कायद्यातील दुसऱ्या महत्वाच्या तरतुदीनुसार मुद्दा म्हणजे आंतरधर्मीय विवाहातून जन्मलेल्या अपत्याचा धर्म हा आईचा विवाहापूर्वीचा मूळ धर्म मानला जाईल. अशा स्वरूपाच्या तरतुदी या नव्या कायद्यात करण्यात आल्या आहेत. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास सात वर्षापर्यंत कारावास आणि एक लाख रुपयापर्यंत आर्थिक दंडाची शिक्षा होऊ शकते. तसेच अशा गुन्ह्याची पुनरावृत्ती झाल्यास दहा वर्षापर्यंत कारावासाची तरतूद करण्यात आली आहे.

जन्म कोणत्या जातीत किंवा धर्मात घ्यावा, हे कोणाच्याही हातात नसते. जन्मानंतर संबंधित धर्माचे तत्त्वज्ञान, धार्मिक रूढी, प्रथा, परंपरा आणि चालीरीती यांचे संस्कार व्यक्तीवर बालपणापासून होत असतात. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्माविषयी अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. मात्र काही वेळा वैचारिक जडणघडण, वैयक्तिक अनुभव किंवा तात्त्विक विचारांच्या प्रभावामुळे एखादी व्यक्ती स्वेच्छेने धर्मांतराचा मार्ग स्वीकारते. अशा स्वेच्छेच्या धर्मांतराला या कायद्याचा विरोध नाही. मात्र बळजबरी, फसवणूक किंवा आमिष दाखवून धर्मांतर करण्यावर या कायद्याने निर्बंध घातले आहेत. त्यामुळे जबरदस्तीने किंवा आर्थिक प्रलोभने देऊन धर्मांतर करण्यास भाग पाडल्यास किंवा तसा प्रयत्न केल्यास संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. तसेच धर्मांतरापूर्वी साठ दिवसांची पूर्वसूचना देण्याच्या अटीमुळे घाईगडबडीत किंवा अविचाराने धर्मांतर करण्यावर काही प्रमाणात आळा बसू शकतो. या कालावधीत संबंधित व्यक्तीला सद्सद्विवेकबुद्धीने निर्णय घेण्याची संधी मिळू शकते.

आपल्या देशात हिंदू, मुस्लीम, जैन, बौध्द, शीख आणि ख्रिश्चन असे प्रमुख धर्म आहेत. या विविध धर्माचे व जातींचे समाज भारतात नांदत आहेत. मोगल काळात काही ठिकाणी जबदरस्तीने धर्मांतर झाल्याच्या घटना इतिहासात आढळतात. मात्र आजची परिस्थिती त्यापेक्षा लक्षणीयरीत्या बदललेली आहे. भारतीय संविधानाच्या भाग तीन मधील कलम २५ नुसार प्रत्येक नागरिकाला धर्माचे पालन, आचरण, प्रचार तसेच धर्म स्वीकारण्याचे स्वातंत्र्य प्रदान करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत नव्याने धर्मस्वातंत्र्य कायदा करण्याची आवश्यकता होती का, हा प्रश्न उपस्थित होतो.

राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्यासाठी तसेच विविध जाती-धर्मांला लोकांना एकत्र बांधण्यासाठी भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षतेचे तत्व स्वीकारले आहे. त्यानुसार सर्व धर्मांना समान दर्जा आणि समान संरक्षण देण्यात आले आहे. एकसंघ राष्ट्र उभारण्याच्या दृष्टीने शासनाकडून आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहांना विविध योजनांद्वारे प्रोत्साहन दिले जात आहे. मात्र दुसरीकडे धर्मस्वातंत्र्य कायद्यातील काही तरतुदींमुळे स्वेच्छेने धर्मांतर करण्याच्या प्रक्रियेवर काही प्रमाणात निर्बंध आले आहेत. त्यामुळे जाती-धर्मातील भिंती पुसट होण्याऐवजी त्या अधिक बळकट होतील का, असा प्रश्न निर्माण होतो. तसेच एखाद्या व्यक्तीने घाईगडबडीत धर्मांतर केले, तर त्यातून शासनाचे नेमके कोणते नुकसान होणार आहे, याचाही विचार होणे आवश्यक आहे.

या कायद्यातील आणखी एक महत्वाची तरतूद म्हणजे आंतरधर्मीय विवाहातून जन्मलेल्या अपत्याचा धर्म हा आईचा विवाहापूर्वीचा धर्म मानला जाईल. मात्र भारतातील पुरुषप्रधान सामाजिक परंपरेनुसार अपत्याच्या नावासमोर पित्याचे नाव व आडनाव लावण्याची प्रथा आहे. अशा परिस्थितीत पित्याचे नाव आणि आईचा धर्म अशी नोंद ठेवणे कितपत सुसंगत ठरेल? यामुळे भविष्यात काही गोंधळ निर्माण होणार नाही का? तसेच या तरतुदीमागे शासनाचा नेमका उद्देश काय आहे, हाही एक प्रश्न उपस्थित होतो.

निश्चितच या कायद्यामागील उद्देश चांगला असू शकतो. मात्र आजच्या परिस्थितीत त्याची आवश्यकता कितपत होती, याविषयी मतभेद असू शकतात. पूर्वीप्रमाणे मोठ्या प्रमाणावर बळजबरीने धर्मांतर होत असल्याचे चित्र आज दिसते का, याचाही वस्तुनिष्ठ विचार होणे गरजेचे आहे. दुसरीकडे आपल्या देशात बेरोजगारी, गरिबी, शिक्षण, आरोग्य, भ्रष्टाचार अशा प्रकारच्या अनेक गंभीर समस्या आहेत. अशा परिस्थितीत शासनाने या प्रश्नांवर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक होते, असे अनेकांचे मत आहे. बदलत्या काळानुसार आंतरजातीय आणि आंतर-धर्मीय विवाहांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे जाती-धर्माच्या प्रश्नांपेक्षा नागरिकांच्या मूलभूत समस्यांकडे शासनाने अधिक लक्ष देणे हीच काळाची खरी गरज आहे.

एकीकडे या कायद्याला 'धर्मस्वातंत्र्य कायदा' असे नाव देण्यात आले असले, तरी भारतीय संविधानातील कलम २५ नुसार नागरिकांना प्राप्त असलेल्या धर्मस्वातंत्र्याच्या अधिकारावर या कायद्या-मुळे काही प्रमाणात मर्यादा आल्याची भावना व्यक्त केली जात आहे. ही बाबही विचारात घेण्यासारखी आहे. व्यक्तीने कोणता धर्म स्वीकारावा व कोणत्या धर्माचा त्याग करावा, हा मूलतः त्या व्यक्तीचा वैयक्तिक आणि खाजगी निर्णय आहे. एखाद्या व्यक्तीने धर्माचा स्वीकार किंवा त्याग केल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर किंवा विकासावर थेट परिणाम होत नाही. मात्र त्याचा परिणाम अनेकदा राजकारणावर होतो. कारण भारतातील राजकारणात जाती आणि धर्म याचा प्रभाव आजही मोठ्या प्रमाणात आहे. विविध राजकीय पक्ष अनेकदा जातीय आणि धार्मिक समीकरणांवर आपले राजकारण केंद्रित करतात. परिणामी, जाती-धर्माच्या आधारावर संघर्ष निर्माण होतात आणि त्याची झळ सर्वसामान्य जनतेला सोसावी लागते. या पार्श्वभूमीवर नव्याने लागू करण्यात आलेला धर्मस्वातंत्र्य कायदा समाजहितासाठी कितपत उपयुक्त ठरेल, त्यातून सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट होईल की नवीन प्रश्न निर्माण होतील, याचा निर्णय अखेरीस समाजानेच वस्तुनिष्ठपणे करावयाचा आहे.

**-डॉ. प्रमोद अर्जुनराव वाघमारे**
महात्मा बसवेश्वर कनिष्ठ
महाविद्यालय, नांदेड
मो. ९३७१२८६२६७

# यश प्राप्तीसाठी संघर्ष अटळ

असे म्हणतात की, अपयशाचे कडू डोस पिल्याशिवाय किंवा पिऊन ते पचवल्याशिवाय यश नावाची आपल्याला सहज हवी हवीशी गोष्ट प्राप्त होत नाही.. प्रत्येकाला यश पाहिजे असते पण त्यासाठी करावा लागणारा संघर्ष किंवा प्रयत्न करण्याची कुणाचीच तयारी असत नाही..अर्थात यालाही काही बोटावर मोजण्याइतके अपवाद असतील, पण जेव्हा आपण आपला इतिहास पाहतो, तेव्हा आपल्या लक्षात येते, की ज्याने कुणी यश प्राप्त केले आहे, त्याला संघर्षाच्या काटेरी मार्गावरून जाऊनच, यश नावाच्या गुलाबाचा सुगंध घेता आला. अर्थातच संघर्ष कुणालाच टाळता आलेला नाही.

स्वातंत्र्य पूर्वीचा भारत व स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणाची आहुती देणारे सर्व भारत मातेचे पुत्र, वीर बलिदानी, यांनी इंग्रजांना भारताच्या बाहेर हाकलून लावण्यासाठी, पराकोटीचा विविध प्रकारचा संघर्ष केला, त्यांनी इंग्रजा विरोधात दीडशे वर्ष संघर्ष करून, लढा देऊन, आपल्याला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करून हे स्वातंत्र्य नावाचे फळ चाखायला दिले.. अर्थातच यशाची फळे चाखायचे असतील, तर माणूस नावाच्या झाडाला ऊन, वारा आणि पाऊस यांच्याशी संघर्ष करावाच लागतो...



छत्रपती शिवरायांना सुद्धा हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यासाठी मुघलांसोबत लढा द्यावा लागला, कठोर संघर्ष करावा लागला.. त्यांनी अखंड संघर्षाच्या, प्रयत्नाच्या, संयमाच्या आणि जिद्दीच्या जोरावर, शून्यातून हिंदवी स्वराज्य निर्माण केले व आपल्यापुढे संघर्षाचे अप्रतिम उदाहरण ठेवले आहे.. त्यांचा हा पराकोटीचा संघर्ष, आपल्याला कितीही प्रतिकूल परिस्थिती असेल, तरी नव्या जोमाने लढायला प्रेरणा देतो..सोबतच संतांचा काळ तर संघर्षाचा काळ म्हणून ओळखला जातो. आपल्या इतिहासात आपल्याला विविध प्रकारच्या गोष्टींसाठी विविध संघर्ष झालेले दिसून येतात, त्यात कुणी जातीपाती विरोधात संघर्ष केला, तर कुणी वर्ण द्वेष विरोधात, कुणी विषमते विरोधात, तर कुणी अन्यायग्रस्त समाजाला, योग्य न्याय मिळवून देण्यासाठी. संघर्षाचे प्रमाण भलेही कमी अधिक असेल, त्याचे स्वरूपही वेगळे असेल पण संघर्ष कुणालाही टळला नाही..

कुणाच्याही अस्तित्वाची नोंद सहजासहजी कुठल्याच काळात, कुणीच घेतलेली दिसून येत नाही..पण ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करून, आपल्या अस्तित्वाची झलक दाखवली किंवा आपले पाय जमिनीवर घट्ट रोऊन, परिस्थितीशी निकराने लढा देऊन, काळाच्या पडद्यावर आपले अखंड अस्तित्व निर्माण केले, जगाने त्यांच्या अस्तित्वाची नोंद घेतली आहे.. माणसाला आपली प्रतिमा उजळ करायची असेल, तर त्याला प्राप्त परिस्थितीशी लढण्याएवढा, दुसरा कुठलाच रामबाण उपाय नसून, तोच एकमेव मार्ग माणसाला आपल्या स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी उपयोगाचा ठरतो.. प्रतिमा त्यांचीच निर्माण होते,ज्यांनी संघर्षाच्या काटेरी मार्गावरून प्रवसा केलेला असतो.. अनेक लढव्या लोकांचा इतिहास, आपल्याला आजही तेवढ्याच जिद्दीने लढण्याची प्रेरणा देत असतो.. किंबहुना पुढच्या पिढीला, लढव्या लोकांचे अनुभव लढायला बळ देत असतात...

देरे हरी पलंगावरी या उक्तीनुसार, जाग्यावर बसून कुणालाही काही मिळालेले नाही व मिळत सुद्धा नाही. जमिनीमध्ये जेव्हा आपण बीज पेरतो, तेव्हा त्यातून उगवून येणाऱ्या रोपट्याला सुद्धा ऊन, वारा आणि पाऊस यांच्यासोबत संघर्ष करूनच आपले अस्तित्व निर्माण करावे लागते.. अर्थातच संघर्षाचा शिवधनुष्य ज्याने ज्याने लीलया पेलला आहे, त्याला त्याला यशाचा मार्ग गवसला आहे. खरे पाहता यशाचा मार्ग हा 'काटेरी मार्ग असतो व वाटेतील काट्यांशी संघर्ष करूनच, कुणालाही आपल्या अस्तित्वाचा किनारा गाठता येतो..

असे म्हणतात की,
अगर इरादे बुलंद हो,
तो रास्ते मिलते है,
अगर इरादे कच्चे
हो, तो बहाने निकलते है

वरील ओळींना समर्पक दाखला म्हणून, कुठल्यातरी राजाने त्याच्या लढाईत पराभूत होण्याचे कारण असे सांगितले होते, की त्याच्या एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात ढाल असल्यामुळे, तो त्याच्या समोरील शत्रूसोबत लढू शकला नाही व त्याचा पराभव झाला.. आपणाला असे निरर्थक कारण देऊन चालणार नाही...जगण्याच्या लढाईत आपणाला केवळ कारणांच्या कुबड्यांचा आधार घेऊन ही लढाई आपण जिंकू शकणार नाही, तर संघर्षाच्या हातात हात देऊन, आपल्याला बिकट परिस्थितीशी दोन हात करता यायला हवे, तरच आपल्याला आपले ठरवलेले निश्चित यश नक्कीच मिळेल...आजचा काळ आणि त्याची जटीलता पाहता मनात यश प्राप्तीच्या केवळ इच्छांचे बीज पेरून, यशाचे पीक उगवणार नाही, तर अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर, तितक्याच ताकदीने प्रयत्न रुपी संघर्षाचा मारा करून, किंबहुना यश प्राप्तीच्या अवघड किनाऱ्याला, प्रयत्नांच्या खडकावर धडका मारूनच आपली यश मिळवण्याची शक्यता गडद होऊ शकते...बाकी संघर्ष कुणालाच टळला नव्हता, टळत नाही व टळणार सुद्धा नाही हे मात्र नक्की...

चला संघर्षाच्या गावाला जाऊ,
संघर्षाने आपले अस्तित्व
निर्माण करु, चला आपल्या
स्वप्नांना मूर्त रूप देऊ..
चला संघर्ष करून तर पाहू...

**-प्रा. अमित शिंदे**
मु. पो. रोहीपिंपळगाव
ता. मुदखेड, जि. नांदेड
मो. ९७६७८५१०४६

# विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके



आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले.

लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही.

मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले.

दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली.

सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत.

दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली.

१४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# आ. चिखलीकर यांचा आजमवाडी ग्रामस्थांशी संवाद



**लोहा (प्रतिनिधी)–** किरोडा–आजमवाडी रस्त्याचे काम लवकरच करू. तसेच शाळेच्या वर्ग खोलीसाठी चौदा लक्ष रुपये देण्याचे पत्र दिले. तसेच ग्रामस्थांशी विविध विषयांवर आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी चर्चा केली. उपोषण करणे योग्य आहे, पण त्यात विकासासाठी राजकारण करणे अयोग्य आहे, असे स्पष्ट मत व्यक्त केले

आजमवाडी येथे चऊतराबाई बालाजी मुंडे यांचे निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी गुरुवारी भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर ग्रामस्थांशी त्यांनी सविस्तर चर्चा केली. यावेळी नायब तहसीलदार डॉ. संदीप हाडगे, सा. बां. विभागाचे उपकार्यकरी अभियंता सुमित पाटील, जि. प. बांधकाम उपविभागीय अभियंता शिवाजी राठोड, अभियंता श्रीकांत गुंडावार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष स्वप्नील पाटील इंगळे, नगरसेवक भास्कर पवार, हरिभाऊ चव्हाण, श्याम पाटील पवार, तुकाराम दाढेल, शंकर वट्टमवार, कृउबा संचालक साहेबराव काळे, ग्रा. प. सदस्य अभंग गाडेकर, माजी सरपंच अशोक गीते, भानुदास कागणे, मोहन मुंडे, तानाजी कागणे, बालाजी मुंडे, परमेश्वर मुरकुटे, यासह पदाधिकारी उपस्थित होते.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी मुंडे कुटुंबियांचे सांत्वन केले त्यानंतर ग्रामस्थांशी अनौपचारिक चर्चा केली किरोडा रोड ते आजमवाडी हा दीड किमी रस्ता करून देण्याचे जाहीर केले तसेच बांधकाम विभागाला तात्काळ अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश दिले .शाळेत जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला वर्ग खोलीसाठी चौदा लक्ष रुपयांचा निधी दिला. तसेच ग्रामस्थांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

गावासाठी रस्ता व्हावा यासाठी एक शिष्टमंडळ राज्याच्या नेत्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे गेले. त्यांनी हा रस्ता आ. चिखलीकर हेच करू शकतात, असे सांगतानाच त्यांनी गावखेड्यात जातीवाद करू नका, त्याचा परिणाम आम्हाला सहन करावा लागत आहे. त्यामुळेच मी पराभूत झाले, या शब्दात पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी या शिष्टमंडळाला सुनावले. उठसुठ दोन्ही तालुक्यात जात प्रवर्गाची ढाल पुढे करून गावोगावी जातीवाद केला जातोय, मात्र हा प्रयोग विधानसभा निवडणुकीत झाला, पण जाणकार मतदारांनी मला साथ दिली असे आमदार प्रतापराव यांनी सांगितले.

कंधार तालुक्यातील आजमवाडीचे कूळ प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, असे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी स्पष्टपणे सांगितले.

## आंबेडकरवादी मिशनच्या माध्यमातून उद्या यूपीएससी परीक्षेच्या तयारीविषयी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** देशातील सुप्रसिद्ध यूपीएससी मार्गदर्शन संस्था नेक्स्ट आयएएस नवी दिल्ली आणि आंबेडकरवादी मिशन नांदेड यांच्या संयुक्तपणे नांदेड येथे कुसुम सभागृहात रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता आयएएस अभ्यासाची रणनीती हा मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

देशातील आधुनिक भारताचे नामवंत मार्गदर्शक नवी दिल्लीच्या माजी आयपीएस आर. सी. सिन्हा, आयएएस मोहित गुप्ता, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, एसीबीचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे आदी मान्यवरांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभणार आहे. एकनाथ मोरे, माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, डॉ. यशवंत चव्हाण, जॉईंट डायरेक्टर कोषागार उत्तम सोनकांबळे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

आयएएस होण्याचे स्वप्न असलेल्या विद्यार्थ्यांनी नवी दिल्ली येथील या नामवंत यूपीएससी मार्गदर्शन संस्थेमधील तज्ज्ञांच्या मार्गदर्शन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी केले आहे.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त हदगावमध्ये आर्य वैश्य महासभेच्यावतीने १०१ झाडांचे वृक्षारोपण

**हदगाव (प्रतिनिधी)–** आर्य वैश्य समाजाचे भूषण तथा माजी वनमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त हदगाव येथे आर्य वैश्य महासभा व आर्य वैश्य समाज यांच्या वतीने तालुक्यात १०१ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा वृक्षारोपणाचा उपक्रम हदगाव येथील अपंग विद्यालयात उत्साहात पार पडला. तालुक्यातील विविध खेडी व शहरांच्या एकत्रित सहभागातून एकूण १०१ झाडे लावण्याचा संकल्प यावेळी पूर्ण करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नांदेड जिल्हा ग्रामीणचे महासभाअध्यक्ष प्रभाकर पत्तेवार तर प्रमुख पाहुणे म्हणून राज्य कार्यकारिणीचे सदस्य शिरीष मनाठकर, राजेश्वर रायवार, जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य डॉ. संजय पलीकोंडावार, प्रसिद्धीप्रमुख सुनील व्यवहारे, आरक्षण समितीचे अध्यक्ष बंडोपंत रायवार, आर्य वैश्य समाजाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मामीडवार, आर्य वैश्य समाजाचे भूषण सुरेश



तुप्तेवार आदींची उपस्थिती होती.

या उपक्रमाचे प्रभावी व सुयोग्य नियोजन हदगाव तालुका वृक्ष समन्वयक राम वट्टमवार यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले असून, स्थानिक नागरिक, स्वयंसेवक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महासभेचे प्रमुख मार्गदर्शक मा. सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित महासभेच्या पार्श्वभूमीवर हा वृक्ष लागवडीचा उपक्रम राबविण्यात आला. या निमित्ताने पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

यावेळी महासभेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर पत्तेवार यांनी प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे असे आवाहन केले. तसेच वृक्ष लागवडीपासून सर्वांना त्याचे काय फायदे होतात या बाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी आजचे वृक्षारोपण हे उद्याच्या पिढीसाठी जीवनदान आहे, असे मत व्यक्त केले. तसेच, प्रत्येक नागरिकाने लावलेल्या वृक्षाचे संगोपन करण्याची जबाबदारीही पार पाडावी, असेही आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमास आर्य वैश्य समाजाचे डॉ. गोकुळ चक्रवार, केरबा रुद्रकंठवार, राजेंद्र मनाठकर, सतीश रेवनवार, मनोज करचलवार, किरण व्यवहारे, अपंग शाळा, मूकबधिर शाळा, मतिमंद शाळांच्या मुख्याध्यापकासह सर्व शिक्षक, शिक्षिका तसेच विद्यार्थी देखील उपस्थित होते.

# बिलोलीतील बंद एसबीआय एटीएम तातडीने सुरू करण्याची मागणी



**बिलोली (प्रतिनिधी)–** बिलोली शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियाचे (एसबीआय) बंद असलेले एटीएम तातडीने सुरू करावे तसेच शहरातील जुना बसस्थानक परिसरात एसबीआयचे स्वतंत्र नवीन एटीएम केंद्र सुरू करावे, अशी मागणी बिलोली नगर परिषदेचे नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी केली आहे.

बिलोली हे तालुक्याचे प्रमुख प्रशासकीय, व्यापारी, शैक्षणिक, आरोग्य व आर्थिक केंद्र आहे. तालुक्यातील विविध गावांमधून नागरिक दररोज शासकीय कार्यालये, बँका, बाजारपेठ, रुग्णालये, शैक्षणिक संस्था तसेच अन्य कामांसाठी बिलोली शहरात येत असतात. स्टेट बँक ऑफ इंडियाचे बिलोली शहरासह तालुक्यात मोठ्या प्रमाणावर ग्राहक आहेत. त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांसाठी एसबीआयच्या एटीएम सेवेचे महत्त्व मोठे आहे.

मात्र, शहरातील एसबीआयचे एटीएम बंद असल्यामुळे ग्राहकांसह सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी, ग्रामीण भागातील नागरिक तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना अचानक पैशांची गरज भासल्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे. एसबीआयचे एटीएम बंद असल्याने नागरिकांना इतर बँकांच्या एटीएमवर अवलंबून राहावे लागत असून, अनेकदा तेथेही रोकड उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

बिलोली हे आरोग्यसेवेच्या दृष्टीने तालुक्यातील महत्त्वाचे केंद्र आहे. ग्रामीण भागातून दररोज मोठ्या संख्येने रुग्ण व त्यांचे नातेवाईक उपचारासाठी शहरात येतात. औषधे, तपासण्या व उपचारासाठी तातडीने रोख रकमेची आवश्यकता भासू शकते. अशा वेळी एटीएम सेवा बंद असणे ही गंभीर अडचण ठरू शकते. त्यामुळे एसबीआयचे एटीएम तातडीने सुरू करून नागरिकांना अखंडित सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## डॉ. अजय क्षीरसागर यांची एनपीडब्ल्यूच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**लोहा (प्रतिनिधी)–** डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोहा येथील प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर यांची नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशन नांदेडच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची ही नियुक्ती महाविद्यालय, विद्यार्थी, फार्मासिस्ट तसेच संपूर्ण नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

डॉ. अजय क्षीरसागर यांना नुकतेच नियुक्तीपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संघटनात्मक कार्याची प्रशंसा करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# नादवेद संगीत विद्यालयाची मासिक विद्यार्थी संगीत सभा उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)–** नादवेद संगीत विद्यालयाच्या मासिक विद्यार्थी संगीत सभेचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि संगीत शिक्षणाची प्रत्यक्ष सादरीकरणातून उजळणी व्हावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या सभेत विद्यार्थ्यांनी गायन, हार्मोनियम वादन, तबला वादन आणि गिटार वादनाचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थित रसिकांची मने जिंकली.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर ज्ञानेश्वरी, स्वरा, शर्विल, ओम आणि रुद्र यांनी सुबह सवेरे लेकर तेरा नाम प्रभू ही प्रार्थना सादर केली. या प्रार्थनेला हार्मोनियमवर समित यांनी तर तबल्यावर स्पंदन आणि परमेश्वर यांनी साथ दिली. यानंतर दुधंबे, रुमाले आणि आकांक्षा यांनी स्वागतगीत सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढविली.

विद्यार्थी रुद्र यांनी राग भूप हार्मोनियमवर सादर केला. त्यांना तबल्यावर वेदिका यांनी साथ दिली. विलोहित यांनी हार्मोनियमवर वंदे मातरम सादर करून देशभक्तीची भावना जागृत केली.

समित यांनी विठू माऊली तू, स्वरा यांनी माझी रेणुका माऊली, स्पंदन यांनी कानडा राजा, ज्ञानेश्वरी यांनी पाऊले चालती पंढरीची वाट, ओम यांनी घागर घेऊन निघाली पाण्या गवळण, चैत्रा यांनी धनी मला बी दाखवा ना विठुरायाची पंढरी, शर्विल यांनी आता तरी देवा मला पावशील का, तर आकांक्षा यांनी जनाई करिते हरी भजन हे भक्तिमय गीत सादर करून उपस्थितांची दाद मिळविली.

देवयानी यांनी गिटारवर अच्युतम केशवम आणि राम आयेंगे या रचना सादर करून कार्यक्रमात वेगळीच रंगत आणली.

यानंतर जय, प्रतीक, देवाशिष आणि स्पंदन यांनी तबला वादनाचे आकर्षक सादरीकरण करून तालवाद्यावरील प्रभुत्व दाखवून दिले.

या नंतर जनकवाडे यांनी यावे यावे घरात सद्गुरुनाथ, गैनवाड यांनी फिरत्या चाकावरती देसी, दुधंबे यांनी जगी जीवनाचे सार, तर रुमाले यांनी रखुमाई रखुमाई हे भावपूर्ण गीत सादर केले. तसेच वेदिका यांनी शास्त्रीय संगीतावर आधारित ख्याल सादर करून उपस्थितांची विशेष वाहवा मिळविली.

कार्यक्रमात हार्मोनियमवर संचालक प्रशांत बोंपिलवार यांनी उत्कृष्ट साथ दिली. विविध सादरीकरणांना तबल्यावर परमेश्वर, स्पंदन, प्रतीक, जय आणि वेदिका यांनी प्रसंगानुरूप सुरेख साथसंगत केली. टाळसाथ ओम आणि दुधंबे यांनी केली.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन गैनवाड यांनी केले. कार्यक्रमाचे चित्रीकरण शुभम गिरी यांनी केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन नादवेद संगीत विद्यालयाच्या सहयोगी शिक्षिका सौ. सागर बोंपिलवार यांनी केले. समारोप प्रसंगी विद्यार्थ्यांनी नियमित रियाज, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि संगीतावरील निष्ठा यामुळे अल्पावधीत केलेल्या प्रगतीचे कौतुक करण्यात आले.

# शोभाताई तळणकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील रंगार गल्ली परिसरातील रहिवासी श्रीमती शोभाताई नरहरराव तळणकर यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी पहाटे ३.१० वाजता निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८२ वर्षे होते.

श्रीमती शोभाताई तळणकर ह्या नांदेड येथील डॉ. तुकाराम तळणकर यांच्या वहिनी होत. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता रंगार गल्ली येथील राहत्या घरून अंत्ययात्रा निघाली. त्यांच्या पार्थिवावर तारातीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## विठ्ठलराव वानखेडे यांचे निधन; आज अंत्यसंस्कार



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड तालुक्यातील बेटसांगवी (कपिलेश्वर) येथील ज्येष्ठ नागरिक विठ्ठलराव बाबाराव पाटील वानखेडे (वय ७३ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता बेटसांगवी (कपिलेश्वर) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे. ते केशवराव पाटील वानखेडे यांचे काका होत.

# आचार्य बाळकृष्ण महाराजांचा जन्मदिन ‘जडीबुटी दिन’ म्हणून उत्साहात साजरा

## वृक्षारोपण, औषधी वनस्पतींचे वाटप आणि वृक्षांचा वाढदिवस साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** महिला पतंजली योग समिती, नांदेड संचलित नित्ययोग वर्गाच्या वतीने श्री बालाजी मंदिर, पारसनगर येथे पतंजली योगपीठाचे आचार्य बाळकृष्ण महाराज यांचा जन्मदिन ‘जडीबुटी दिन’ म्हणून वृक्षारोपण, औषधी वनस्पतींचे वितरण आणि मागील वर्षी लावलेल्या वृक्षांचा वाढदिवस साजरा करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास वृक्षमित्र फाऊंडेशनचे संतोष मुगटकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. महिला पतंजली योग समितीच्या जिल्हा प्रभारी डॉ.



नंदिनी चौधरी यांनी प्रास्ताविकात आचार्य बाळकृष्ण महाराज यांच्या आयुर्वेद, योग व औषधी वनस्पती संवर्धनातील कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत जडीबुटींचे आरोग्यदायी महत्त्व स्पष्ट केले.

यावेळी वृक्षमित्र संतोष मुगटकर यांनी पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षांचे अनन्य–साधारण महत्त्व अधोरेखित करत घरच्या घरी तयार करता येणाऱ्या सेंद्रिय औषधी द्रावणांद्वारे वृक्षांचे संगोपण कसे करावे, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच ‘हरित नांदेड अभियान’ अंतर्गत प्रत्येक महिलेने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी योग वर्गातील महिलांना जखमजोडी, कढीपत्ता, अश्वगंधा, कोरफड, कडूनिंब, आवळा, जांभूळ, गुळवेल, पानफुटी आदी विविध औषधी वनस्पतींची रोपे भेट देण्यात आली. तसेच मागील वर्षी मंदिर परिसरात लावलेल्या वृक्षांचे उत्कृष्ट संगोपन केल्याबद्दल त्या वृक्षांना फुलांचे हार अर्पण करून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर परिसरात नवीन वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

श्री बालाजी मंदिर, पारसनगर येथे गेल्या पाच वर्षांपासून महिला पतंजली योग समितीच्या वतीने महिलांसाठी दररोज सकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत नि:शुल्क योगवर्ग चालविला जातो. या वर्गात ६० ते ७० महिला नियमित योगाभ्यास करतात. डॉ. नंदिनी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक महिलांनी योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैली स्वीकारली आहे.


# आदिवासी कोळी समाजातर्फे उद्या गुणवंतांचा सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रमाचे

**नांदेड (प्रतिनिधी)–** आदिवासी कोळी महादेव, मल्हार कोळी, ढोर कोळी जमातीच्या वतीने गुणवंतांचा सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी राजयोग हॉटेल, नमस्कार चौक, नांदेड येथे आयोजित समारंभात मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी व क्रीडापटूंचा सत्कार समारंभ पार पडणार आहे.

यात इयत्ता ४ थी, ५ वी, ७ वी, ८ वी शिष्यवृत्ती गुणवत्तायादीतील विद्यार्थी, नवोदय विद्यालय प्रवेश, सैनिक विद्यालय, इयत्ता १० वीत ७५% पेक्षा अधिक व इ. १२ वीत ७०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी, आयआयटी, एनआयआयटी प्रवेश व सीईटी ९०% पेक्षा अधिक गुण, नीट परीक्षा ४५० पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी, यूपीएससी, एमपीएससी, सीए, नेट–सेट उत्तीर्ण विद्यार्थी, पीएच.डी. धारक विद्यार्थी, नीट पीजी निवड विद्यार्थी, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील क्रीडापटू तसेच शासकीय सेवा प्रवेश आणि सेवानिवृत्त कर्मचारी यांचाही सन्मान करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास आदिवासी कोळी महादेव, मल्हार कोळी, ढोर कोळी जमातीतील सर्व समाजबांधव, युवक, महिला भगिनी आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आदिवासी कोळी महादेव, मल्हार कोळी, ढोर कोळी जमात नांदेड जिल्हा यांनी केले आहे.

# एमजीएममध्ये फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रम संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात डायरेक्टर डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात संगणकशास्त्र अभियांत्रिकी विभागातर्फे प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग या विषयावरील एफडीपी कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमास साधन व्यक्ती म्हणून विश्वनिकेतन (व्हीआयएमइइटी) नवी मुंबई या विख्यात संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. संदीप इनामदार यांना निमंत्रित करण्यात आले होते. संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.अर्चना राजूरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगिरे यांनी पाहुण्यांचे गांधीजींची प्रतिमा आणि फुले देऊन स्वागत केले.

यावेळी डॉ. इनामदार आपल्या मार्गदर्शन भाषणात म्हणाले, प्रकल्प–आधारित शिक्षण काळाची गरज आहे, ज्यामध्ये विद्यार्थी प्रत्यक्ष कृती करून, समस्या सोडवून आणि मोठे प्रकल्प पूर्ण करून नवीन गोष्टी शिकतात. ही पद्धत शिक्षण कायम मनात धरून ठेवते, शिकलेले विसरत नाही. ते पुढे म्हणाले, प्रश्न, उत्तर आणि मार्क्स ही सध्याची शिक्षण पद्धती योग्य नाही. यातून शिक्षकांनी बाहेर पडावे आणि पीबीएलचा वापर करावा.

कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, शिक्षक मोठ्या संख्येत उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मोहमद एजाज यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी पद्माकर देशमुख, संगणोर, प्रशांत देशमुख आणि शेख रशीद यांचे सहकार्य लाभले.

## राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेसाठी अर्जास मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

ही योजना १ जुलै २०२६ पासून आपले सरकार पोर्टलवर राज्य सेवा हक्क अधिनियमांतर्गत कार्यान्वित करण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ होती. राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल होत असल्याने काही वेळा सर्व्हरवरील ताण आणि तांत्रिक अडचणींमुळे अर्ज सादर करण्यात अडथळे येत असल्याचे निदर्शनास आले. तसेच विविध कलावंत संघटनांनीही अर्जासाठी मुदतवाढ देण्याची मागणी शासनाकडे केली होती.

या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांना अर्ज करण्याची पुरेशी संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद, नांदेड यांच्या वतीने पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांनी या मुदतवाढीचा लाभ घेऊन १५ ऑगस्ट २०२६ पूर्वी आपले सरकार पोर्टलवर आपले अर्ज ऑनलाईन सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गुरु–शिष्य परंपरा ही अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारी –गोविंद नांदेडे

**नांदेड (प्रतिनिधी)–** गुरू ही एक व्यक्ती नसून एक तत्त्व आहे. गुरू म्हणजे प्रकाश. गुरू– शिष्याचे सुंदर नाते ही आपली भारतीय परंपरा आहे. अंधाराकडून प्रकाशाकडे आणि काट्याकडून फुलाकडे नेणारी ही गुरू परंपरा प्राचीन काळापासून चालू आहे. ती अशीच चालू ठेवावी. कारण ही उज्ज्वल परंपरा आहे. गुरुची महिमा अगाध आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सेवानिवृत्त शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी केले.

गुरुकृपेमुळे अनेक शिष्यांचे कल्याण झाले आहे. गुरूंच्या पवित्र सान्निध्यामुळे विवेक जागृत होऊन शिष्याच्या अंगी नम्रता आणि शालिनता प्राप्त होते. शिष्यांनी गुरु होण्यासाठी सातत्याने शिकत राहावे, असा मोलाचा संदेश महाराष्ट्राचे पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी दिला.



योग विद्या धाम नांदेडतर्फे नुकतेच गुरु पौर्णिमेनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योग विद्या धाम नांदेडचे अध्यक्ष आर. डी. केंद्रे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे सेवानिवृत्त शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, इंजि. संजय पवार, एम. डी. नल्लावार, सौ. कविता आष्टुरकर, सौ. शकुंतला कलंबरकर, नागोराव पोलादवार, नारायणराव आष्टुरकर, देविदास टेळकीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माधवराव वाघमारे, त्र्यंबक गायकवाड, राजू कोल्हे, नवनाथ देशमुख, बाबाराव इबितवार, संतोष काकडे, राजेंद्र जगताप, डॉ. सायन्ना मठमवार आदींनी विशेष परिश्रम घेतले. प्रारंभी ध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते योग शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन. डी. पोलादवार यांनी केले तर आभार एम. डी. नल्लावार यांनी मानले. पेयपानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## ट्रेनमधून मोफत किती सामान नेता येते?



### अतिरिक्त सामानाची ऑनलाइन नोंदणी कशी कराल? जाणून घ्या नवे रेल्वे नियम...

भारतीय रेल्वेने ३१ जुलैपासून अतिरिक्त सामानासोबत (Excess Luggage) प्रवास करण्याबाबतचे नियम अधिक कडक केले आहेत. निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त सामान असल्यास प्रवाशांना त्याची पूर्वमाहिती देणे आणि अतिरिक्त शुल्क भरणे बंधनकारक करण्यात आले आहे. आता ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करता येणार असल्याने स्टेशनवरील पार्सल कार्यालयाच्या फेऱ्यांपासून प्रवाशांची सुटका होणार आहे. यापूर्वी अतिरिक्त सामान घेऊन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पार्सल कार्यालयात जाऊन प्रक्रिया पूर्ण करावी लागत होती. आता रेल्वेने ऑनलाइन बुकिंगची सुविधा सुरू केली असून, तिकीट आरक्षित करतानाच अतिरिक्त सामानाची नोंदणी आणि शुल्काचा ऑनलाइन भरणा करता येणार आहे. यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल आणि स्टेशनवरील धावपळही कमी होईल.

### कोणत्या प्रवाशांना मिळणार सुविधा?

ही सुविधा निवडक आरक्षित श्रेणीतील प्रवाशांसाठी उपलब्ध आहे. एसी फर्स्ट क्लास, एसी २-टियर, फर्स्ट क्लास, स्लीपर क्लास, सेकंड क्लास या श्रेणीतील कन्फर्म तिकीटधारक प्रवासी याचा लाभ घेऊ शकतात. मात्र एसी ३-टियर, एसी ३ इकॉनॉमी आणि एसी चेअर कार या श्रेणींना ही सुविधा लागू नाही. कारण या श्रेणींमध्ये मोफत नेण्याची परवानगी असलेले सामानच कमाल मर्यादा मानली जाते.

### अतिरिक्त सामानाचे शुल्क किती?

किमान शुल्क ३० रुपये आहे. शुल्काची गणना प्रत्येक १० किलोच्या टप्प्यानुसार केली जाते. म्हणजेच वजन १ किंवा २ किलोने जास्त असले तरी १० किलोचे पूर्ण शुल्क आकारले जाईल. जर सामानाची मात्रा मोफत मर्यादेपेक्षा जास्त असेल, पण परवानगीच्या कमाल मर्यादेपेक्षा कमी असेल, तर अतिरिक्त शुल्क भरावे लागेल.

| प्रवास श्रेणी | मोफत मर्यादा |
|---|---|
| एसी फर्स्ट क्लास | ७० किलो |
| एसी २-टियर | ५० किलो |
| स्लीपर क्लास | ४० किलो |
| सेकंड क्लास | ३५ किलो |

### ऑनलाइन नोंदणी कशी कराल?

अतिरिक्त सामानासाठी ऑनलाइन बुकिंग करण्यासाठी खालील प्रक्रिया पूर्ण करा. parcel.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा तिकीट बुक करताना Book Excess Luggage हा पर्याय निवडा. आपल्या कन्फर्म तिकिटाचा PNR क्रमांक, प्रवासाचे प्रारंभ व गंतव्य स्थानक, रेल्वे क्रमांक तसेच अतिरिक्त सामानाचे वजन आणि आकार याची माहिती भरा. माहिती तपासून अर्ज सादर करा आणि ऑनलाइन शुल्क भरा. त्यानंतर मिळणारा e-Forwarding Note डाउनलोड करून जतन करा किंवा त्याची प्रिंट काढा. प्रवासाच्या दिवशी पार्सल कार्यालयात जाऊन सामानासह e-Forwarding Note दाखवा. तेथे सामानाचे अंतिम वजन करण्यात येईल. त्यानंतर Railway Receipt दिली जाईल. गंतव्य स्थानकावर सामान ताब्यात घेण्यासाठी ही पावती आवश्यक असेल. प्रवासादरम्यान रेल्वेच्या Track & Trace सुविधेद्वारे सामानाचे स्थान ऑनलाइन पाहता येईल. सामान गंतव्य स्थानकावर पोहोचल्यावर एसएमएसद्वारेही माहिती दिली जाईल.

### प्रवाशांसाठी महत्त्वाची सूचना

नवीन नियमानुसार, निश्चित मर्यादेपेक्षा जास्त सामान घेऊन प्रवास करत असल्यास त्याची पूर्वमाहिती देणे आवश्यक आहे. अन्यथा अतिरिक्त शुल्क किंवा नियमानुसार कारवाईला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे प्रवासापूर्वी सामानाचे वजन तपासून आवश्यक असल्यास ऑनलाइन नोंदणी करणे अधिक सोयीचे ठरेल.

## QR कोडमधील 'QR' म्हणजे नेमके काय?



### रोज वापरतो, पण त्याचा इतिहास किती जणांना माहिती आहे?

**डिजिटल व्यवहारांच्या युगात QR कोड हा आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. ऑनलाइन पेमेंट, वाय-फाय कनेक्ट करणे, तिकिटे, वेबसाइट्स किंवा उत्पादनांची माहिती मिळवणे अशा अनेक कामांसाठी आपण दररोज QR कोड स्कॅन करतो. मात्र, QR कोडमधील 'QR' म्हणजे नेमके काय? आणि ही तंत्रज्ञानाची संकल्पना प्रथम कोणी विकसित केली, याची माहिती अनेकांना नसते. विशेष म्हणजे, QR कोडची निर्मिती एखाद्या तंत्रज्ञान कंपनीने नव्हे, तर टोयोटा समूहातील डेन्सो वेव्ह (Denso Wave) या कंपनीने केली होती.**



### QR म्हणजे काय?

QR म्हणजे Quick Response (क्विक रिस्पॉन्स), अर्थात त्वरित प्रतिसाद. या नावाप्रमाणेच QR कोड स्कॅन होताच त्यामध्ये साठवलेली माहिती क्षणार्धात उपलब्ध होते. त्यामुळे माहितीची देवाणघेवाण जलद आणि सोपी होते. QR कोडचा शोध डेन्सो वेव्ह या टोयोटा समूहातील कंपनीचे अभियंता मासाहिरो हारा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लावला. सुरुवातीला या तंत्रज्ञानाचा वापर मोटारगाड्यांच्या सुट्या भागांचा मागोवा (Tracking) घेण्यासाठी करण्यात आला होता. त्यावेळी वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक बारकोडची क्षमता मर्यादित होती. बारकोडमध्ये कमी माहिती साठवता येत असल्याने वाहनांच्या लहान भागांवर आवश्यक माहिती देणे कठीण जात होते. या समस्येवर उपाय म्हणून QR कोड विकसित करण्यात आला. QR कोडमध्ये कमी जागेत अधिक माहिती साठवता येते आणि तो अतिशय वेगाने स्कॅन होतो. त्यामुळे बारकोडच्या मर्यादा मोठ्या प्रमाणात दूर झाल्या.

### QR कोड अधिक उपयुक्त का ठरले?

QR कोडचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तो अंशतः खराब झाला, थोडा फाटला किंवा मळला तरीही अनेकदा सहज स्कॅन करता येतो. आज QR कोडचा वापर विविध क्षेत्रांत केला जातो. जसे, की ऑनलाइन आणि UPI पेमेंट, वाय-फाय नेटवर्कशी जोडण्यासाठी, वेबसाइट किंवा ॲपची लिंक उघडण्यासाठी, उत्पादनांची माहिती मिळवण्यासाठी, तिकिटे, मेनू कार्ड आणि डिजिटल दस्तऐवजांसाठी. यामुळे मोठे URL, संकेतशब्द किंवा इतर माहिती टाइप करण्याची गरज राहत नाही.

### QR कोड पूर्णपणे सुरक्षित आहेत का?

QR कोड उपयुक्त असले तरी ते शंभर टक्के सुरक्षित आहेत, असे म्हणता येत नाही. इतर कोणत्याही डिजिटल तंत्रज्ञानाप्रमाणे त्याचाही गैरवापर होऊ शकतो. सायबर गुन्हेगार बनावट QR कोडच्या माध्यमातून फसवणुकीचे प्रकार करू शकतात. त्यामुळे काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. विश्वासार्ह आणि अधिकृत QR कोडच स्कॅन करा. सार्वजनिक ठिकाणी किंवा संशयास्पद पार्सलवर लावलेले अज्ञात QR कोड स्कॅन करणे टाळा. QR कोड स्कॅन केल्यानंतर अनोळखी ॲप डाउनलोड करण्यास सांगितल्यास, ते अधिकृत ॲप स्टोअरवर उपलब्ध आहे का, याची खात्री करा. QR कोडद्वारे पैसे पाठवण्यापूर्वी समोरील व्यक्ती किंवा संस्थेचे नाव आणि खाते तपशील नीट पडताळून पाहा.

### आजच्या डिजिटल युगातील महत्त्वाचे साधन

कारखान्यातील उत्पादन व्यवस्थापनासाठी विकसित करण्यात आलेला QR कोड आज जगभरातील अब्जावधी लोकांच्या दैनंदिन व्यवहारांचा महत्त्वाचा भाग बनला आहे. माहितीची जलद देवाणघेवाण, सोपी वापरपद्धती आणि बहुउपयोगी स्वरूपामुळे QR कोडचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, त्याचा वापर करताना आवश्यक ती सावधगिरी बाळगणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

## विदेशी मदत नाकारली, टाटा अन् वेम्बूंच्या पाठबळावर भारताने तयार केली पहिली स्वदेशी MRI मशीन!

**भारताने वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वाची झेप घेतली आहे. बंगळुरूस्थित 'व्हॉक्सेलग्रिड्स' (Voxelgrids) या स्टार्टअपने पूर्णपणे भारतीय तंत्रज्ञानावर आधारित देशातील पहिली स्वदेशी MRI (एमआरआय) मशीन विकसित केली आहे. विशेष म्हणजे, आर्थिक अडचणींना तोंड देत असताना या स्टार्टअपला दिवंगत उद्योगपती रतन टाटा आणि झोहोचे संस्थापक श्रीधर वेम्बू यांनी दिलेल्या पाठबळामुळे हा प्रकल्प यशस्वी झाला.**

» भारतातील बहुतांश रुग्णालयांमध्ये वापरल्या जाणाऱ्या एमआरआय यंत्रणा परदेशातून आयात केल्या जातात. त्यामुळे त्यांची किंमत आणि देखभाल खर्चही मोठा असतो. अशा परिस्थितीत व्हॉक्सेलग्रिड्सने स्वदेशी तंत्रज्ञानाच्या बळावर भारतीय गरजांनुसार एमआरआय मशीन तयार करून वैद्यकीय उपकरणांच्या क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे मोठे पाऊल टाकले आहे. या मशीनमुळे एमआरआय स्कॅनचा खर्च सुमारे ७० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो. त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांनाही कमी खर्चात अत्याधुनिक निदान सेवा उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

» परदेशी मशीनपेक्षा स्वस्त अन् हलकी : स्वदेशी एमआरआय मशीन परदेशी मशीनच्या तुलनेत सुमारे ४० टक्के स्वस्त आणि ५० टक्के हलकी आहे. त्यामुळे ती रुग्णालयांमध्ये बसविणे, हलविणे आणि देखभाल करणे अधिक सोपे ठरते. याशिवाय या मशीनमध्ये परदेशी एमआरआय यंत्रणांच्या तुलनेत एकतृतीयांश केबल्सचा वापर करण्यात आला असून ती कमी वीज वापरते. एमआरआय मशीनमध्ये सामान्यतः अतिशय महागड्या हीलियम वायूचा वापर केला जातो. मात्र, व्हॉक्सेलग्रिड्सच्या मशीनमध्ये नायट्रोजन वापरण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे मशीन चालविण्याचा खर्च आणखी कमी होण्यास मदत होणार आहे.

» अर्जुन अरुणाचलम यांची महत्त्वाची भूमिका : या प्रकल्पामागे इलेक्ट्रॉनिक्स अभियंता अर्जुन अरुणाचलम यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ विस्कॉन्सिन- मॅडिसन येथून शिक्षण घेतले असून GE हेल्थकेअरच्या संशोधन केंद्रातही काम केले आहे. भारतात परतल्यानंतर त्यांनी आयआयटी बॉम्बेमध्ये अध्यापन सुरू केले. त्यावेळी भारतीय शैक्षणिक आणि संशोधन संस्थांकडे स्वतःची एमआरआय मशीन नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. तसेच परदेशी कंपन्या भारतीय संस्थांकडे गांभीर्याने पाहत नसल्याचेही त्यांनी अनुभवले. यानंतर त्यांनी स्वदेशी एमआरआय मशीन विकसित करण्याचा निर्धार केला.

» परदेशी कंपनीची भागीदारी नाकारली : कोरोना काळात व्हॉक्सेलग्रिड्स आर्थिक संकटात सापडली होती. त्यावेळी एका मोठ्या परदेशी कंपनीने भागीदारीचा प्रस्ताव दिला. मात्र, अशा भागीदारीमुळे स्टार्टअपची स्वतंत्र ओळख आणि उद्दिष्ट धोक्यात येऊ शकते, या कारणामुळे अर्जुन अरुणाचलम यांनी तो प्रस्ताव नाकारला. २०१५ मध्ये रतन टाटा यांची भेट झाल्यानंतर व्हॉक्सेलग्रिड्सला पहिल्या एमआरआय मशीनची आगाऊ ऑर्डर मिळाली. विशेष म्हणजे, त्यावेळी कंपनीचे उत्पादन पूर्णपणे तयारही झाले नव्हते. यानंतर झोहोचे संस्थापक श्रीधर वेम्बू यांनीही या स्टार्टअपवर विश्वास व्यक्त करत आर्थिक आणि नैतिक पाठबळ दिले. त्यांच्या सहकार्यामुळे स्वदेशी एमआरआय मशीन विकसित करण्याच्या प्रयत्नांना मोठी चालना मिळाली.

» भारतासाठी का महत्त्वाची आहे ही कामगिरी? : भारत दरवर्षी हजारो कोटी रुपयांची एमआरआय उपकरणे परदेशातून आयात करतो. देशातच कमी किमतीत आणि स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित एमआरआय मशीन तयार होऊ लागल्यास आयातीवरील अवलंबित्व कमी होईल. त्याचबरोबर ग्रामीण आणि दुर्गम भागांपर्यंत अत्याधुनिक निदान सुविधा कमी खर्चात उपलब्ध होण्यास मदत होईल.

## पीएम किसान सन्मान निधीचा हप्ता खात्यात जमा झाला का?

### मोबाईलवरून 3 सोप्या पद्धतींनी तपासा; जाणून घ्या संपूर्ण प्रक्रिया...



केंद्र सरकारच्या पीएम किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी ६,००० रुपयांची आर्थिक मदत तीन समान हप्त्यांमध्ये (प्रत्येकी २,००० रुपये) दिली जाते. जर आपण या योजनेचे लाभार्थी असाल आणि आपल्या खात्यात हप्ता जमा झाला आहे की नाही, हे जाणून घ्यायचे असेल, तर ते मोबाईलवरून अवघ्या काही मिनिटांत तपासता येते. अधिकृत संकेतस्थळ आणि अधिकृत ॲपच्या माध्यमातून ही माहिती मिळवता येते. पीएम किसान सन्मान निधी योजनेत पात्र शेतकरी कुटुंबांच्या आधारशी संलग्न बँक खात्यात दरवर्षी ६,००० रुपये तीन समान हप्त्यांत जमा केले जातात. आतापर्यंत या योजनेअंतर्गत २३ हप्त्यांद्वारे ४.४६ लाख कोटी रुपयांहून अधिक निधी देशभरातील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. मात्र, या योजनेचा लाभ फक्त त्या शेतकऱ्यांनाच मिळतो, ज्यांचे जमीन पडताळणी (Land Seeding), आधार-बँक खाते संलग्नता (Aadhaar Seeding) आणि e-KYC पूर्ण झालेले आहे. जर आपल्या खात्यात हप्ता जमा झाला आहे की नाही, हे तपासायचे असेल, तर तीन सोप्या पद्धतींचा वापर करू शकता.

### पीएम किसानच्या अधिकृत संकेतस्थळावरून हप्ता तपासा

सर्वप्रथम pmkisan.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या. मुख्य पानावर खाली स्क्रोल करून Farmers Corner विभागातील Know Your Status या पर्यायावर क्लिक करा. त्यानंतर आपला नोंदणी क्रमांक (Registration Number) आणि स्क्रीनवर दिसणारा कॅप्चा कोड भरा. नोंदणी क्रमांक माहित नसल्यास Know Your Registration Number या पर्यायावर क्लिक करून मोबाईल क्रमांक किंवा आधार क्रमांकाच्या मदतीने तो मिळवू शकता. त्यानंतर Get OTP वर क्लिक करून आलेला ओटीपी टाका. स्टेटसमध्ये FTO Processed – Yes आणि Payment Success असे दिसत असल्यास, आपल्या खात्यात हप्ता जमा झालेला आहे.

### PMKISAN GoI ॲपद्वारे हप्ता तपासा


गुगल प्ले स्टोअरवरून PMKISAN GoI हे अधिकृत ॲप डाउनलोड करून स्थापित करा. ॲपमध्ये लॉग-इन केल्यानंतर Farmer Corner मधील Beneficiary Status या पर्यायावर क्लिक करा. आपला नोंदणी क्रमांक किंवा मोबाईल क्रमांक प्रविष्ट करा. नोंदणीकृत मोबाईलवर आलेला ओटीपी टाकून पडताळणी पूर्ण करा. त्यानंतर Beneficiary Status किंवा Payment Status या पर्यायावर क्लिक करा. स्क्रीनवर संपूर्ण व्यवहाराचा तपशील दिसेल. त्यामध्ये Payment Success असा संदेश असल्यास हप्ता खात्यात जमा झाल्याची खात्री होते.

### संपूर्ण गावातील लाभार्थ्यांची यादी डाउनलोड करा

आपल्या गावातील पीएम किसान सन्मान निधी योजनेचे लाभार्थी कोण आहेत, याची यादीही अधिकृत संकेतस्थळावरून डाउनलोड करता येते. pmkisan.gov.in या संकेतस्थळावर जा. Beneficiary List या पर्यायावर क्लिक करा. त्यानंतर राज्य, जिल्हा, तालुका, ब्लॉक आणि गाव यांची माहिती निवडा. Get Report या बटणावर क्लिक करा. त्यानंतर आपल्या गावातील सर्व लाभार्थ्यांची यादी स्क्रीनवर दिसेल. त्यामध्ये आपण स्वतःचे तसेच इतर लाभार्थ्यांची नावे तपासू शकता.

### लाभ मिळण्यासाठी या अटी पूर्ण असणे आवश्यक

पीएम किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळण्यासाठी काही बाबी पूर्ण असणे आवश्यक आहे. यात जमीन पडताळणी (Land Seeding) पूर्ण असणे, आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न असणे, e-KYC पूर्ण केलेले असणे, योजनेत नोंदणी केलेली असणे. या सर्व प्रक्रिया पूर्ण असल्यास, पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात सरकारकडून हप्त्याची रक्कम थेट जमा केली जाते.



# कर्जमाफीसाठी ५०२९ कोटी वर्ग, ६ लाख २२ हजार शेतकऱ्यांचं कर्ज माफ

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या ५०२९ कोटी रुपयांचा हा पहिला हप्ता वर्ग करण्यात आला. या रकमेतून ६ लाख २२ हजार २०७ शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी करत असताना पहिल्या टप्प्यात कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण होईल, दुसऱ्या टप्प्यात प्रोत्साहनपर रक्कम वर्ग केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. त्या योजनेच्या अंतर्गत आषाढी एकादशीला आपण पहिली यादी घोषित केली होती. घोषित केलेली यादी ही आपण सर्व ग्रामपंचायतींना पाठवली होती. शेतकऱ्यांनी केवळ आधार ऑथेंटिकेशन करायचं आहे. कुठलाही अर्ज नाही किंवा कुठल्याही प्रकारचे इतर गोष्टींची आवश्यकता नाही असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. अॅग्रीस्टॅक नंबर आणि आधार ऑथेंटिकेशन करून त्यांची खाती नील करायची अशा प्रकारचं आपण काम हातामध्ये घेतलं होतं आज जवळपास ५०२९ कोटी रुपयांचा पहिला हप्ता ६ लाख २२ हजार २०७ शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये गेला आहे आणि ही खाती नील झालेली आहेत, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांचे मध्यंतरी काही गैरसमज असे झाले होते की की आमच्यावरच कर्ज जास्ती दिसतय आणि आमच्या नावावर मंजूर पैसे कमी आहेत. त्याचं कारण जे काही एनपीए वर लांवलेलं व्याज होतं, त्या व्याजामुळे ते जास्त दिसत होतं.

बँकांनी ते व्याज रद्द केल्यामुळे आता अकाउंट मधले पैसे आणि शासनाने त्यांच्या अकाउंटला भरलेले पैसे म्हणजे कर्जाचे अकाऊंट मधले पैसे आणि शासनाने भरलेले पैसे हे सारखे असल्यामुळे ही अकाउंट नील झालेली आहेत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. आता रोज मोठ्या प्रमाणात ही अकाउंट्स येता आहेत अशी व्यवस्था केलेली आहे. जसे जसे अकाउंट येतील ऑथेंटिकेट होतील तसं तसं त्या खात्यांमध्ये पैसे जातील, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

अजूनही म्हणजे जवळपास हे १८ ते १९ लाख खाती जे आहेत त्याची प्रोसेस चालली आहे. १२ लाख खाती जी आहेत ती बँकांना परत पाठवलेली आहेत. कारण बँकांनी त्यात चुका केलेल्या आहेत. बँकांनी साधारणपणे आठवड्याभरामध्ये त्या खात्यांमध्ये सुधारणा करुन पाठवणार असल्याचं सांगितल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्ही या योजनेत दोनच टप्पे केलेले आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये आम्ही सगळे कर्जमाफीचे पैसे भरतो आहोत. दुसऱ्या टप्प्यात आम्ही प्रोत्साहनपर अनुदानाचे पैसे देणार आहोत. कर्जमाफी झाल्यानंतर नवं कर्ज मिळण्यासाठी शेतकऱ्यांना अडचण येणार कोणतीही अडचण येणार नाही, असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

## अग्नी-४ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

**ओडिशा (वृत्तसंस्था)** – ओडिशातील चांदीपूर किनारपट्टीवर भारताने अग्नी-४ या मध्यम पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची रात्री यशस्वी चाचणी केली. स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांडच्या देखरेखीखाली पार पडलेल्या या चाचणीमुळे भारताच्या सामरिक संरक्षण क्षमतेला आणखी बळ मिळाल्याचे मानले जात आहे. ही चाचणी नियोजित कार्यक्रमाचा भाग असल्याचे सांगण्यात आले असून, विविध तांत्रिक बाबींची यशस्वी पडताळणी करण्यात आली.

अग्नी-४ हे अण्वस्त्र वाहून नेण्यास सक्षम क्षेपणास्त्र असून त्याची मारक क्षमता सुमारे ३,५०० ते ४,००० किलोमीटरपर्यंत आहे. या क्षमतेमुळे भारताच्या सीमांपासून दूर असलेल्या महत्त्वाच्या सामरिक ठिकाणांपर्यंत हे क्षेपणास्त्र पोहोचू शकते. भारताची अण्वस्त्रविषयक भूमिका 'नो फर्स्ट यूज' या धोरणावर आधारित आहे. म्हणजेच भारत कोणत्याही देशावर प्रथम अण्वस्त्र हल्ला करत नाही.

# संसदेत घडामोडींना वेग! काँग्रेसकडून तीन ओळींचा 'व्हिप' जारी

## एनडीएच्या सर्व खासदारांना दिल्लीत राहण्याचे आदेश

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – संसदेच्या मान्सून अधिवेशनादरम्यान लोकसभेत आपली पूर्ण ताकद दाखवण्यासाठी मुख्य विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसने मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू केली आहे. शुक्रवारी, ७ ऑगस्ट रोजी काँग्रेस पक्षाने आपल्या सर्व लोकसभा खासदारांना तीन ओळींचा व्हिप जारी करून सभागृहात उपस्थित राहण्याचे अत्यंत कडक निर्देश दिले आहेत. १०, ११ आणि १२ ऑगस्ट रोजी संसदेत महत्त्वाच्या विधेयकावर चर्चा होणार असून त्यासाठी उपस्थित राहावे, असा आदेश काँग्रेसने त्यांच्या खासदारांना दिला आहे.

दुसऱ्या बाजूला, सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीनेही आपल्या सर्व खासदारांना सोमवार, १० ऑगस्टपासून राजधानी दिल्लीतच हजर राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

लोकसभेतील काँग्रेस संसदीय पक्षाचे मुख्य व्हिप कोडिकुन्निल सुरेश यांनी शुक्रवारी हा थ्री-लाईन व्हिप जारी केला. त्यानुसार, १०, ११ आणि १२ ऑगस्ट (सोमवार ते बुधवार) या तीन दिवसांत सर्व खासदारांनी सकाळी ११ वाजल्यापासून सभागृहाचे कामकाज स्थगित होईपर्यंत अनिवार्यपणे उपस्थित राहावे, असे आदेश देण्यात आले आहेत.

या तीन दिवसांत लोकसभेत अत्यंत महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील विषयांवर चर्चा होणार असून, पक्षाची अधिकृत भूमिका ठामपणे मांडण्याचे निर्देश खासदारांना देण्यात आले आहेत. कोणत्याही परिस्थितीत खासदारांची अनुपस्थिती सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही नोटिसीत देण्यात आला आहे. काँग्रेस आणि भाजपने त्यांच्या खासदारांना कोणत्याही परिस्थितीत दिल्ली सोडू नये, असे आदेश दिले आहे. त्यामागे मतदारसंघ पुनर्रचना विधेयक हे कारण असल्याची चर्चा सुरू आहे. गेल्या अर्थसंकल्पात मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करून घेण्यात भाजपला अपयश आलं होतं. आता आकड्यांची जुळवाजुळव करण्यात भाजपला यश आल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळे येत्या दोन ते तीन दिवसात हे विधेयक लोकसभेच्या पटलावर मांडण्यात येणार असल्याची चर्चा सुरू आहे.

# पीएम मोदींची ठाकरेंच्या शिवसेनेतून फुटलेल्या सहा खासदारांसोबत भेट

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवसेनेच्या खासदारांशी ब्रेकफास्ट बैठकीत संवाद साधला. या बैठकीची इनसाईड स्टोरी आता समोर आली आहे. बैठकीत राजकीय घडामोडींसोबतच मतदारसंघातील विकासकामांवर भर देण्याचा महत्त्वपूर्ण सल्ला पंतप्रधानांनी खासदारांना दिला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या बैठकीत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत गेलेल्या खासदारांची वैयक्तिक विचारपूस केली. आपल्या मतदारसंघातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी सत्तेचा उपयोग करा, असा थेट कानमंत्र त्यांनी खासदारांना दिला. कुठल्याही प्रकारची विकासकामे असतील, तर थेट पंतप्रधान कार्यालयाशी संवाद साधावा, असे स्पष्ट निर्देशही त्यांनी दिले.

या संवादादरम्यान पंतप्रधान मोदी यांनी प्रत्येक खासदाराशी स्वतंत्रपणे चर्चा केली. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्याशी बोलताना पंतप्रधानांनी त्यांच्या दैनंदिन योगाभ्यासाबद्दल विशेष माहिती जाणून घेतल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बैठकीत शिवसेनेच्या सात खासदारांनी सहभाग घेतला होता. ओमराजे निंबाळकर, संजय (बंडू) जाधव, भाऊसाहेब वाकचौरे, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर, संजय दिना पाटील, ज्योती वाघमारे हे खासदार पंतप्रधान मोदींसोबत झालेल्या ब्रेकफास्ट बैठकीत उपस्थित असल्याची माहिती समोर येत आहे.

## टी.सी. हरवली

माझी **गार्गी गणेश जोगदंड** या नावाची बारावी पासची टी. सी. सिडको ते जुना मोंढा ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**– संपर्क पत्ता –**
**गार्गी जोगदंड ११,**
**मेन रोड, मु.पो. शिरड**
**शहापूर जि. हिंगोली**

## Change In Name

My Old Name is **MOHAMAD ISA ABDUL KHADAR** which now I am changing as New Name **ISA ABDULKHADAR SHAIKH.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** H.No. 1926, Vasant Nagar, At.Po.
Naigaon, Tq. Naigaon (Kh.)
Dist. Nanded 431709

## Change In Name

My Old Name is **MOHAMAD MOHASIN BEGUM MOHAMAD ISA** which now I am changing as New Name **MOHSINABEGUM ISA SHAIKH.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** H.No. 1926, Vasant Nagar, At.Po.
Naigaon, Tq. Naigaon (Kh.)
Dist. Nanded 431709

## Change In Name

My Old Name is **MOHAMAD FAROJ** which now I am changing as New Name **FAROJ ISA SHAIKH.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** H.No. 1926, Vasant Nagar,
At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.)
Dist. Nanded 431709

## जाहीर नोटीस
### जिल्हा न्यायाधीश-01 व मोटार अपघात न्यायालय.1, उदगीर यांचे न्यायालयात

M.A.C.P.No.2/2024
माया वि. सदाशिव
नि.क.

प्रति,
1) सदाशिव आढावराव गोरठकर
रा. सायाळ ता. भोकर जि. नांदेड.
2) जगन गोविंदराव बुठेवाड
रा. राईखोड पोस्ट, हाळदा ता. भोकर जि. नांदेड.

सदरच्या जाहिर प्रगटानाव्दारे आपणास कळविण्यात येते की, माया दशरथ वाघमारे, वय-35 वर्षे, धंदा- घरकाम, रा. मोर्तलवाडी, ता. उदगीर, जि.लातूर यांनी आपल्याविरूध्द मोटार अपघात कायद्यांतर्गत सदर न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये आपण गैरअर्जदार क.1 व 2 आहात. आपणास न्यायालयामार्फत ब-याच वेळा नोटिस काढली असता व स्पीड पोस्टाने नोटीस काढली असता सदर नोटीस तामील होत नसल्याने अर्जदाराचे विधीज्ञांनी आपल्याविरूध्द जाहिर नोटिस काढण्यासंबधी या न्यायालयास अर्ज केला आहे. तो अर्ज न्यायालयाने मंजुर केला असून तुम्हास या जाहिर नोटिसव्दारे कळविण्यात येते कि, तुम्ही दि.16/09/2026 रोजी सकाळी 10.30 वा. जिल्हा न्यायाधीश-01 व मोटार अपघात न्यायालय, उदगीर येथे स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे व आपले म्हणणे मुदतीत सादर करावे अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन आपल्या गैरहजेरित या अर्जाची सुनावणी होवून आपल्या विरुध्द एकतर्फा आदेश पारित केला जाईल.

आज दि. 05/08/2026 रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(आदेशावरुन)
(श्री.एस.ई.गायकवाड) — कनिष्ठ लिपीक, जिल्हा न्यायालय – १, उदगीर
(श्री.जी.व्ही. बिराजदार — अधीक्षक, जिल्हा न्यायालय – १, उदगीर

## सेवा पुस्तिका हरवली


माझी व्यंकटराव भुजंगराव केंद्रे या नावाची सेवा पुस्तिका (केंद्र प्रमुख, मंगल सांगवी, शिक्षण विभाग, कंधार) कंधार ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता–**
**व्यंकटराव भुजंगराव केंद्रे**
**रा. मु.पो. माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड**
**मो.नं. ९४२०६७०९३०**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## जाहीर प्रगटन

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदार श्री दिगांबर गंगाराम घोडेकर रा. रायबोड ता. भोकर यांनी त्यांचे शासकीय गायरान पट्टा जमीन मौजे रायखोड येथील गट क्र. ४६ मधील क्षेत्र २.०२ है.आर. जमीनीबाबत भोगवटादार वर्ग २ चे वर्ग १ करणे बाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने मौ. रायखोड येथील गट क्र. ४६ मधील क्षेत्र २.०२ हे.आर. या जमीनीचे भोगवटादार वर्ग २ आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमीनी भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतरीत करणे संदर्भात ज्या व्यक्तीस हितसंबंधीत व्यकतीस आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास तर ती त्यांनी १५ दिवसांच्या आंत लेखी स्वरुपात आवश्यक त्या दस्तपैवजासह दाखल करावा. विहीत मुदतीत प्राप्त होणारे आक्षेप/हरकती किंवा मोघम स्वरूपात सादर केलेल्या आक्षेप/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**(विनोद गुंडमवार)**
**तहसिलदार, भोकर**

## जाहिर प्रगटन
### मौजे लोहा ता.लोहा जि.नांदेड येथील शेत स.नं. 86/6 पैकी प्लॉट क्र. 7 संबंधी

दिनांक :- 07/08/2026

माझे पक्षकार **संजय पिता रामजी दवणे, रा.शारदा नगर नांदेड** यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन जाहिर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकाराने **रत्नाकर पि. लक्ष्मणराव हाळदेकर, रा.माऊली नगर मुखेड ता.मुखेड जि.नांदेड** यांच्या जाती मालकी व ताब्यातील मौजे लोहा ता.लोहा जि.नांदेड येथील शेत स.नं. 86/6 पैकी प्लॉट क्र. 7 आहे. ज्याचा न.पा.मा.क्रं.3331/7 जो की गुंठेवारी झालेला आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ 123.24 चौ.मीटर आहे. ज्याची चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| पुर्वेस | : गट नं. 86 चा भाग आहे. | पश्चिमेस | : 9 मीटरचा अंतर्गत रोड आहे. |
| दक्षिणेस | : प्लॉट नं. 6 आहे. | उत्तरेस | : प्लॉट नं. 8 आहे. |

सदर चतु:सिमे आतील प्लॉट हे माझे पक्षकाराने खरेदी करण्याचा करार केला असुन बयाणा पोटी रक्कम दिली आहे व लवकरच रजिस्ट्री विक्रीखत करून घेणार आहेत.

जर वरील व्यवहारास कोणाचे काही अक्षेप, उजर असल्यास त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून 7 (सात) दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर आपले लेखी आक्षेप नोंदवावे. मुदतीच्या आत कोणाचे आक्षेप आले नाही तर कोणाचे कांही आक्षेप नाही असे गृहीत धरुन माझे पक्षकार रजिस्ट्री विक्रीखत करुन घेतील व मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

करीता हे प्रगटन.

जाहिर प्रगटन देणार
ॲड.इम्रान खान पठाण
जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड
मो.नं. 9423759079

## जाहिर प्रगटन

माझे पक्षकार श्री. बालाजी पि. शंकरराव सनपुरकर रा. लोहा ता. लोहा जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन व पुरविलेल्या कागदपत्रावरुन मी खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

हे की, माझ्या पक्षकारांनी मा. न्यायालय लोहा येथे नियमिमत दिवाणी दावा क्र. १६६/२०२५ हा मदन पि. शंकरराव सनपुरकर व ईतर यांच्या विरुध्द वडिलोपार्जित मालमत्तेत वाटणी मिळण्यासाठी दाखल केला आहे तो प्रलंबित आहे.

हे की, असे असतांना प्रस्तुतच्या दाव्यामध्ये समाविष्ट मालमत्ता शेत गट क्र. ३४७ क्षेत्र १ हे. ७३ आर स्थित बेरळी ता. लोहा जि. नांदेड ही ईतर कोणास मदन शंकरराव सनपुरकर हे सदर मालमत्ता ही फक्त त्यांच्या नावावर असण्याचा गैरफायदा घेऊन विक्री करण्याच्या इराद्याने खरेदीदारांना दाखवत आहेत असे माझ्या पक्षकारास खात्रीलायकरित्या समजले आहे.

तरी सर्व संबंधितांना या जाहीर प्रगटनाव्दारे संबंधितांना सुचित करण्यात येते की, वर नमूद मालमत्ते संदर्भात कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार माझ्या पक्षकाराच्या अपरोक्ष मदन शंकरराव सनपुरकर यांचया सोबत करु नये अन्यथा माझे पक्षकार संबंधितांविरुध्द दिवाणी व फौजदारी स्वरुपाच्या कारवाय दाखल करतील त्याच्या होणाऱ्या परिणामास संबंधित जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत,
अे.के. वाघमारे
वंकिल, नांदेड
मो.क्र. ७५५७९३९३५८

जाहीर प्रगटन देणार
बालाजी शंकरराव सनपुरकर
रा. लोहा ता. लोहा जि. नांदेड

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात

श्री विठ्ठलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ विठलवाडी लोहा संचलित,

संस्था कोड - **271504 SC 019**

**कै. विश्वनाथराव नळगे माध्यमिक विद्यालय, लोहा संलग्न श्री केरबाजी बिडवई उच्च माध्यमिक वि.लोहा ता. लोहा जि. नांदेड**

श्री विठ्ठलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ विठलवाडी लोहा संचलित, कै. विश्वनाथराव नळगे माध्यमिक विद्यालय, लोहा सलग्न श्री केरबाजी बिडवई उच्च माध्यमिक वि.लोहा ता. लोहा जि. नांदेड येथील **100 टक्के** अनुदानित **03** रिक्त जागेवर शिक्षण सेवक पद भरतीसाठी प्राधान्यक्रम दिलेल्या प्रवित्र प्रणाली मार्फत भरती करण्यासाठी जाहिरात देत आहोत.

| अ.क्र. | गट | विषय | पदसंख्या | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | शिकवण्याचे माध्यम | शैक्षणिक / व्यावसायिक पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | माध्यमिक 6 ते 8 | गणित-विज्ञान | 1 | एकत्रित मानधन दरमहा 16000 | 100% | सेमी / मराठी | B.Sc.(pcm), B.ed |
| 2 | माध्यमिक 9 ते 10 | विज्ञान | 1 | एकत्रित मानधन दरमहा 18000 | 100% | सेमी / मराठी | B.Sc./M.Sc. , B.ed |
| 3 | माध्यमिक 9 ते 10 | गणित-विज्ञान | 1 | एकत्रित मानधन दरमहा 18000 | 100% | सेमी / मराठी | B.Sc./M.Sc. (pcm) , B.ed |

**वरील सर्व पदाचे आरक्षण पुढील प्रमाणे राहील.**
1. वरील तीन (03) रिक्त पदासाठी आरक्षण राहील. **SC-02, ST-01, SEBC-02**
2. वरील तीन (03) रिक्त पदासाठी सामाजिक आरक्षण राहील. **SC-01 महिला राखिव., SEBC-01 महिला राखिव.**
3. पवित्र पोर्टलवर सस्थेने दिलेल्या जाहिरातीनुसार पवित्रपोर्टलचे व बिंदुनामावलीचे सर्व नियम / अटी लागु राहतील.

| मुख्याध्यापक | सचिव | अध्यक्ष |
|---|---|---|
| **अनिल ल. हामदे** | **लक्ष्मीकांत बिडवई** | **केरबाजी बिडवई** |
| **9860 866 567** | **9423 243 494** | **9767 998 182** |

## श्री नृसिंह सहकारी सुतगिरणी मर्या. खानापूर .
### वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस
(फक्त सभासदांसाठी)

दि.०७/०८/२०२६

श्री नृसिंह सहकारी सुतगिरणी म. खानापूर ता.देगलूर जि.नांदेड च्या सर्व सभासदांना या नोटीसी द्वारे विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, सुतगिरणीची सन २०२५-२०२६ या वर्षाची वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक २२/०८/२०२६ रोज शनिवार सकाळी ११.०० वाजता सुतगिरणीचे खानापूर साईटवर, उपाध्यक्ष मा.श्री बाळासाहेब रामराव पाटील खतगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनीमय करण्यासाठी आयोजीत करण्यात आली आहे. तरी कृपया सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेपुढील विषय :
१) मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) दि. ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेर ताळेबंद, नफातोटा व वार्षिक अहवालास मंजुरी देणे.
३) मा.संचालक मंडळाने सन २०२६-२०२७ साला करीता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
४) दि.०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेर नफातोटा पत्रकास व झालेले खर्चास मंजुरी देणे.
५) सन २०२५-२०२६ अखेर वैधानिक लेखापरिक्षण अहवाल स्विकारणे व मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
६) सन २०२६-२०२७ साला करीता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणुक करणे.
७) संस्था उपविधीतिल तरतुदीनुसार बाहेरुन उभारावयाच्या कर्जाची मर्यादा ठरविणे.
८) सन २०२५-२०२६ अखेर अंदाजपत्रकापेक्षा कमी अगर जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
९) मा.अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशावरुन
प्रशासन अधिकारी

नोट :
१) सभा कोरम अभावी तहकूब झाल्यास तिच सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल त्यावेळी कोरमची आवश्यकता भासणार नाही.
२) दि. ३१/०३/२०२६ अखेरची हिशोब पत्रके सुट्टी वगळता कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
३) सभासदाना काही प्रश्न व सुचना विचारावयाचे असल्यास सभेपुर्वी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवस आगोदर लेखी स्वरुपात सुतगिरणीचे कार्यालयीन वेळेत पोहचतिल आशारितीने पाठविण्यात याव्यात. त्यानंतर अगर आयत्यावेळी विचारलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.
४) सुतगिरणीचे ज्या सभासदांनी आपले वारस सुतगिरणीकडे नोंदविलेले नाहीत. त्यांनी वारसांची नोंद करुन घ्यावी.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.


पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## नांदेडच्या घटनेनंतर हदगाव-वारंगा-नांदेड उड्डाण पुलांवर 'मलमपट्टी'; वाहनधारकांत धास्ती

- पुलांवर डांबर-सिमेंटची डागडुजी
- कायमस्वरूपी दुरुस्तीची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)**- नागपूर/बुटीबोरी-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील वारंगा ते महागाव पुलाचे काम करणाऱ्या सद्भाव कंपनीच्या आणि वारंगा ते नांदेड दरम्यान काम करणाऱ्या केटी कन्स्ट्रक्शनच्या कामातील बेजबाबदारपणामुळे नांदेडच्या विष्णुपुरी येथील उड्डाणपूल कोसळला होता. यात दोन विद्यार्थिनीं जखमी झाल्या होत्या. येथील उड्डाणपुलाच्या रस्त्याला जागोजागी तडे गेल्याची घटना ताजी असतानाच हदगाव-वारंगा-नांदेड रोडवरील विविध उड्डाणपुलांवर सुरू असलेल्या दुरुस्तीच्या कामांमुळे नागरिकांमध्ये धास्ती निर्माण झाली आहे.

अनेक ठिकाणी पुलावरील तडे आणि खड्डे बुजविण्यासाठी डांबर व सिमेंटचा वापर करून तात्पुरती 'मलमपट्टी' केली जात असल्याचे चित्र आहे. या दुरुस्तीमुळे पुलाची सुरक्षितता कितपत सुनिश्चित झाली आहे, असा प्रश्न वाहनचालक आणि प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

विशेषतः दररोज हजारो वाहने या मार्गावरून प्रवास करत असल्याने पुलांच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये चिंता आहे. केवळ तात्पुरती मलमपट्टी करण्याऐवजी पुलांची तांत्रिक तपासणी करून आवश्यक त्या ठिकाणी कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी. तसेच संबंधित यंत्रणांनी पुलांच्या सुरक्षिततेबाबत स्पष्ट माहिती जाहीर करून नागरिकांचा संभ्रम दूर करावा, अशी मागणी वाहनधारकांसह सर्वसामान्यांकडून होत आहे.

या डागडुजीबाबत काम करणाऱ्या कामगारांकडे विचारणा केली असता त्यांनी याबाबत माहिती देणे टाळले. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने नियमित तपासणी करून आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी अपेक्षा वाहनधारक आणि सर्वसामान्य नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## स्मार्ट मीटर व सोलार कृषी पंप जोडणीवरून गोंधळ; शेतकरी त्रस्त

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)**- मराठवाड्यात महावितरण कंपनीच्यावतीने सुरू असलेल्या स्मार्ट मीटर आणि शेतकऱ्यांसाठी कृषी पंप सोलारवर लावण्याच्या कामाबाबत मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली जात आहे. हे काम शेजारील राज्यातील एनसी कंपनी करीत असून, कंपनीच्या बेजबाबदार कारभारामुळे शेतकरी, वीज ग्राहकांची चांगलीच हेळसांड होत आहे.

मात्र, या संपूर्ण प्रकारावर नांदेड जिल्ह्यातील खासदार आणि आमदार मात्र गप्प असल्याची खंत शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. मराठवाड्यात घरगुती वापराचे स्मार्ट मीटर बसवण्याचे काम एनसी कंपनीकडे आहे. मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात वीज ग्राहक असतानाही आतापर्यंत अत्यंत कमी प्रमाणात स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत. कंपनीला दिलेल्या वेळेची कालमर्यादा संपली तरीही स्मार्ट मीटर बसविण्यातही कंपनीची सध्या तरी प्रगती होताना दिसत नाही. नांदेड परिमंडळात जवळपास १५ लाखांहून अधिक सर्व क्षेत्रातील वीज ग्राहक आहेत. ज्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत तेथील ग्राहकांच्या देखील बिल, रिचार्ज आणि तांत्रिक बिघाडांबाबत प्रचंड तक्रारी महावितरणकडे प्राप्त होत आहेत.

दुसरीकडे शेतकऱ्यांचे सर्व कृषी पंप कनेक्शन हे केवळ सोलारवरच लावून देण्यात येत आहेत. याला महावितरणचा अट्टाहास असल्याचे शेतकरी सांगत आहेत. मात्र, सोलार यंत्रणेवर कृषी पंप पाहिजे तेवढे पाणी उपसा करू शकत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न घटत आहे आणि याचा थेट परिणाम राष्ट्रीय उत्पन्नावरही होत आहे. अगोदरच अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला आता महावितरणचा हा 'सोलार सक्तीचा शॉक' बसत आहे. शेतकऱ्यांना परवडेल आणि पुरेसा पाणी उपसा करेल अशा पारंपरिक वीज कनेक्शनची त्यांची मागणी आहे.

## ३ वर्षांपूर्वीच्या गुन्ह्यातील ३ फरार आरोपी ओडिशा-तेलंगणातून ताब्यात



**५ लाखांचा मुद्देमाल जप्त**

**नांदेड (प्रतिनिधी)**-नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील तीन वर्षांपूर्वी घडलेल्या बॅग लिफ्टिंगच्या गुन्ह्यातील फरार असलेल्या तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेचे एपीआय रवी वाहुळे यांच्या पथकाने ओडिशा आणि तेलंगणा येथून ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून ५ लाख ३०० रुपये किमतीचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. २ ऑगस्ट २०२३ रोजी फिर्यादी प्रशांत प्रभाकर डहाळे, रा. सिडको, नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अज्ञात आरोपींनी त्यांची बॅग चोरी करून त्यातील सोन्याचे दागिने व इतर मौल्यवान ऐवज पळवून नेला होता. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन गु.र.नं. ५६१/२०२३, भादवी कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास सुरू असताना यापूर्वी दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून सुमारे १३ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. मात्र, या गुन्ह्यातील आणखी तीन आरोपी गेल्या तीन वर्षांपासून फरार होते. फरार आरोपींचा शोध घेऊन उर्वरित मुद्देमाल हस्तगत करण्याबाबत पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांना विशेष सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार सपोनि रवी वाहुळे व त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि आंतरराज्यीय शोधमोहीम राबविली. तपासादरम्यान आरोपी ओडिशा राज्यातील जाजपूर परिसरात असल्याची माहिती मिळाली. पुढे गोपनीय बातमीदारामार्फत आरोपी बासर, जिल्हा निर्मल, राज्य तेलंगणा येथे आल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पथकाने तेथे सापळा रचला. सापळ्यात औला गंगा औला रामुल वय ४० वर्षे, रा. पुराबाकोटे, जि. जाजपूर, ओडिशा, कंचना दास येशू दास वय ४० वर्षे, रा. पुराबाकोटे, जि. जाजपूर, ओडिशा, चिनबाबू रामू प्रधान वय २३ वर्षे, रा. दसमनिया, जि. जाजपूर, ओडिशा या तिघांना अटक करण्यात आली. ताब्यात घेतलेल्या आरोपींकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी बॅग लिफ्टिंग गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून गुन्ह्यातील ५ लाख ३०० रुपये किमतीचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने आणि पोनि अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सपोनि रवी वाहुळे यांच्यासह पोउपनि माधव केंद्रे, बळीराम दासरे व पोलीस अंमलदार देविदास चव्हाण, ब्रम्हानंद लामतुरे, शेख उमर, दिलीप चंचलवार, मोतीराम पवार, सिद्धार्थ सोनसळे, भाग्यश्री सूर्यवंशी (सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड), तसेच प्रतिभा तरटे, उज्ज्वला सदावर्ते (नांदेड ग्रामीण) व सायबर सेलचे रेश्मा पठाण, राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे यांचा संयुक्त सहभाग होता.

## विसावा उद्यानासमोरील कॅफेला आग



**नांदेड (प्रतिनिधी)** -शहरातील स्टेशन रोडवरील विसावा उद्यानासमोर असलेल्या कॅफे एक्सप्रेस व इटालियन बेकरी येथे शुक्रवारी पहाटे भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. मात्र अग्निशमन दलाच्या तातडीच्या आणि शर्थीच्या प्रयत्नांमुळे जीवितहानी टळली असून, शेजारील व्यावसायिक दुकाने वाचविण्यात यश आली.

अग्निशमन विभागाला ७ ऑगस्ट रोजी पहाटे १.३४ वाजता आग लागल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तातडीने पथक घटनास्थळी रवाना करण्यात आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दुसरे अग्निशमन पथकही पाचारण करण्यात आले. रात्रीची वेळ असल्याने कॅफे व इटालियन बेकरीचे शटर बंद होते. त्यामुळे आग विझविण्यास मोठा अडथळा निर्माण झाला. अग्निशमन दलाने प्रसंगावधान राखत अग्निशमन वाहनाच्या विंचच्या साहाय्याने शटर तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर अथक परिश्रमानंतर आग पूर्णपणे विझवून मोठी दुर्घटना टाळली.

या घटनेत विराज अग्रवाल व श्वेता अग्रवाल हे घरातून सुखरूप बाहेर पडले. तसेच त्यांचा एक पाळीव कुत्रा देखील सुरक्षित बाहेर काढण्यात आला. याशिवाय त्यांचे घर आणि दोन मोपेड स्कूटर आगीपासून वाचविण्यात आल्या. या आगीत महेश संभाजी माळगे यांचे कॅफे एक्सप्रेसमधील फर्निचर, सिलिंग, विद्युत वायरिंग, इन्व्हर्टर व इतर साहित्य जळून अंदाजे ३ ते ४ लाख रुपयांचे नुकसान झाले. कॅफेमधील तीन एलपीजी सिलेंडर सुरक्षित बाहेर काढल्याने मोठा स्फोट टळला. स्वप्नील वादेवाड यांच्या इटालियन बेकरीतील २ फ्रिज, २ एसी, २ डीप फ्रीज, सीसीटीव्ही यंत्रणा, सिलिंग, फर्निचर व हॉटेलमधील साहित्य जळाले. शरद कपाटे यांचे वैभव बुक सेंटरमधील १ फ्रिज व अंदाजे १ लाख रुपयांचे स्टेशनरी साहित्य आगीत जळाले.

## बप्पाच्या पर्यावरणपूरक मूर्तींना वाढती मागणी; यंदा किमती वाढण्याची शक्यता



**नांदेड (प्रतिनिधी)**- अवघ्या काही दिवसांवर श्री गणेशोत्सव येऊन ठेपला असून, शहरासह ग्रामीण भागातील श्री गणेशमूर्ती तयार करणाऱ्या मूर्तिकारांनी कामाला वेग दिला आहे. लहान- मोठ्या गणेशमूर्तींना अंतिम आकार देण्याचे काम सुरू आहे. गणेशभक्तांच्या पसंतीनुसार आकर्षक आणि पर्यावरणपूरक शाडू मातीच्या मूर्ती घडवल्या जात आहेत.

मात्र, यंदा मूर्ती निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमतींमुळे मूर्तिकारांसमोर आर्थिक आव्हान उभे राहिले आहे. मूर्तिकारांच्या कार्यशाळांमध्ये सध्या साचे तयार करणे, मूर्तीचा सांगाडा उभारणे, शाडू माती अथवा प्लास्टरचा लेप देणे, कोरीव काम, वाळवणे आणि रंगकामाची तयारी सुरू आहे. गणेशोत्सव जवळ आल्याने अनेक कार्यशाळांमध्ये दिवस-रात्र काम सुरू असून, वेळेत मूर्ती तयार करण्यासाठी कारागीर मेहनत घेत आहेत.

कच्च्या मालाच्या दरात मोठी वाढ झाल्याने यंदा पर्यावरणपूरक गणेशमूर्तींना वाढती मागणी असल्याने शाडू मातीचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. मात्र शाडू मातीच्या दरात गेल्या वर्षाच्या तुलनेत वाढ झाली आहे. याशिवाय रंग, प्रायमर, वार्निश, ब्रश, फायबर साचे, लोखंडी वायर, बांबू, गोंद, सजावटीचे साहित्य, मुकुट, कृत्रिम दागिने तसेच वाहतूक खर्चातही वाढ झाल्याने मूर्ती तयार करण्याचा खर्च लक्षणीयरीत्या वाढला आहे.

## 'अबकड' उपवर्गीकरणावरून संघर्ष नको, समन्वय हवा; आंबेडकरी नेत्यांचे आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)**- महाराष्ट्रातील अनुसूचित जाती प्रवर्गातील 'अबकड' उपवर्गीकरणाचा प्रश्न केवळ मोर्चे, आंदोलने किंवा उपोषणांमधून सुटणार नाही. हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी दोन्ही समाजांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन संवाद साधणे आवश्यक आहे. याबाबत ठाम भूमिका घेत समन्वय साधण्याचे कार्य वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर हेच प्रभावीपणे करू शकतील, असा विश्वास आंबेडकरी चळवळीचे नेते सुरेश गायकवाड यांनी व्यक्त केला.

शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत सुरेश गायकवाड बोलत होते. अनुसूचित जाती प्रवर्गातील 'अबकड' उपवर्गीकरणाच्या प्रश्नामुळे दोन समाजांमध्ये वैमनस्य निर्माण होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. राज्य सरकारची भूमिका या उपवर्गीकरणाला अप्रत्यक्ष पाठिंबा देणारी असल्याचे दिसून येत असून त्यामुळे दोन समाजात दुजाभाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे गायकवाड म्हणाले.


## कै. बळवंतराव चव्हाण यांना अनेक मान्यवरांकडून आदरांजली



**नायगाव (प्रतिनिधी)** -साधी राहणी उच्च विचार आणि ऋषीतुल्य व्यक्तीमत्व म्हणून परिचित असलेले कै. माजी आमदार बळवंतराव चव्हाण यांचे सोमवारी १९ वे पुण्यस्मरण झाले. यानिमित्त चव्हाण परिवारासह अनेक मान्यवरांनी समाधीस्थळी जाऊन आदरांजली वाहिली.

यावेळी पंकज चव्हाण, श्रीकांत चव्हाण, अजित चव्हाण, सुमित चव्हाण, विराज चव्हाण आणि सार्थक चव्हाण यांच्या हस्ते समाधी स्थळाचे पूजन करण्यात आले. केशवराव पाटील चव्हाण, हनुमंतराव पाटील चव्हाण, सुधाकर पाटील चव्हाण, आनंदराव पाटील चव्हाण, श्रीनिवास पाटील चव्हाण, धनंजय पाटील चव्हाण, विजय पाटील चव्हाण, श्रीधर पाटील चव्हाण, डॉ. विश्वास पाटील चव्हाण यांच्यासह चव्हाण परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

यावेळी माधवराव बेळगे, बळवंतराव पाटील बेटमोगरेकर, माजी प्राचार्य गोविंद मेथे, पंडित पाटील खैरगावकर, बी. आर. कदम, प्रा. बलभीम वाघमारे, माजी प्राचार्य के. जी. सूर्यवंशी, माजी प्राचार्य बाळासाहेब इंगळे, माजी प्राचार्य के. हरिबाबू, माजी शिक्षण सभापती संजय बेळगे, विठ्ठल पावडे, कैलास कऱ्हाळे, आत्माराम चव्हाण, प्रल्हाद पाटील इज्जतगावकर, गोविंदराव शिंदे, वसंतराव खैरगावकर, बेळगे, अशोक पाटील सोमठाणकर, यादव पाटील शिंदे, माजी नगरसेवक रमेश शिंदे, संजय चव्हाण, माणिक चव्हाण, अविनाश अंजणीकर, जाधव, शिवराज वरवटे, दत्ता पाटील इज्जतगावकर, प्रल्हाद पाटील होटाळकर, मधुकर ताटे, भगवान पाटील लंगडापुरे, बालाजी बेटमोगरेकर, माधव कुलकर्णी यांच्यासह मोठ्या प्रमाणात पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.



## जिल्हाधिकारी कर्डिले यांची अन्नपूर्णा महिला शेतकरी गटास भेट



**नैसर्गिक शेतीच्या उपक्रमांचे कौतुक**

**नांदेड (प्रतिनिधी)** -नांदेड तालुक्यातील सिद्धनाथ येथील अन्नपूर्णा महिला शेतकरी गटाने राबविलेल्या नैसर्गिक शेती व शाश्वत कृषी उपक्रमांची जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शुक्रवारी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. 'सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा-२०२६' अंतर्गत गटाने उभारलेल्या विविध प्रकल्पांचे त्यांनी कौतुक करत महिलांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेचा लाभ घेऊन मूल्यवर्धित प्रकल्प उभारावेत, असे आवाहन केले.

अन्नपूर्णा महिला शेतकरी गटातील १५ सदस्यांनी एकत्रितपणे ३ हजार लिटर जीवामृत निर्मितीचे प्रात्यक्षिक, १५ व्हर्मी बेडच्या माध्यमातून गांडूळ खत निर्मिती, परसबाग विकास, वृक्षलागवड तसेच सोयाबीन पिकातील एसओपी (स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर) अंमलबजावणी या उपक्रमांची जिल्हाधिकाऱ्यांना माहिती दिली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मृदेचे पूजन करण्यात आले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी महिला गटातील समन्वय आणि नियोजनाचे विशेष कौतुक केले. सकारात्मक ऊर्जा आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या बळावर राज्यस्तरीय स्पर्धेत यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा देत, पीएमएफएमई योजनेतून प्रक्रिया उद्योग उभारण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

यावेळी गावकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीने सजविलेल्या बैलगाडीतून टाळ-मृदंगाच्या गजरात मान्यवरांची मिरवणूक काढून औक्षणाने स्वागत केले. कार्यक्रमास गावचे सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, माजी सरपंच, शिवानंद स्वामी मठ संस्थानचे विश्वस्त आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी गटाने जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळा उभारावी, त्यासाठी कृषी विभागाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य दिले जाईल, असे आश्वासन दिले. तसेच भविष्यात सीड बँक उभारून स्थानिक बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी व विक्रीद्वारे अतिरिक्त उत्पन्न मिळविण्याचा सल्ला दिला.

कृषी विज्ञान केंद्र पोखरणीचे प्रमुख डॉ. देविकांत देशमुख यांनी शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्राला भेट देऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहन केले. सहायक कृषी अधिकारी तथा मेंटॉर कैलास पेरके यांनी जीवामृत तयार करण्याचे प्रात्यक्षिक सादर केले, तर पाणी फाउंडेशनचे तालुका समन्वयक प्रवीण खुळे यांनी 'सत्यमेव जयते फार्मर कप' स्पर्धेची माहिती देत नैसर्गिक शेतीमुळे उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल, मंडळ कृषी अधिकारी सुनील सानप, उपकृषी अधिकारी लक्ष्मण चचुवार, सहायक कृषी अधिकारी वसंत जारीकोटे, कैलास पेरके, पाणी फाउंडेशनचे प्रवीण खुळे व विशाल इंगळे, उमेदचे तालुका समन्वयक हनुमंत कंदुरके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वसंत जारीकोटे यांनी केले, तर गटाच्या निमंत्रक जयश्री आवातीरक यांनी एसओपी अंमलबजावणीची माहिती देऊन आभार मानले.

## अवैध वाळूने भरलेला ४०.२५ लाखांचा हायवा जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**- पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मुखेड पोलीस ठाण्याच्या पथकाने मोठी कारवाई केली आहे. विनापरवाना वाळू वाहतूक करणारा एक हायवा टिप्पर जप्त करून ४० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी नरसी ते मुखेड जाणाऱ्या रस्त्यावर हायवा क्र. क्र एमएच-०४-जेयू-०४८६ मध्ये अवैध वाळू वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलीस पथकाने सापळा रचून सदर हायवा अडवला. तपासणीत चालकाने आपले नाव उद्धव रामचंद्र भरकडे, वय ३० वर्षे, रा. कौडगाव, ता. लोहा असे सांगितले. हायवामध्ये अंदाजे ५ ब्रास वाळू आढळून आली. चालकाकडे वाळू वाहतुकीसाठी आवश्यक रॉयल्टी किंवा वैध परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. चौकशीत सदर वाहनाचे मालक कृष्णाजी दशरथ भरकडे, रा. कौडगाव, ता. लोहा, जि. नांदेड असल्याचे समोर आले.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com